CMYK

सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३२६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे...

### स्टॅलिन यांचा भाजपवर आरोप

**चेन्नई :** केंद्रातील भाजप सरकारकडून हिंदी भाषा लादण्याची मर्यादा ओलांडली जात आहे', या शब्दांत तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी बुधवारी जोरदार हल्लाबोल केला. तिरुचिरापल्ली रेल्वे विभागीय कार्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या कमानीवर हिंदी भाषेतील नाव देण्याच्या निर्णयाचा त्यांनी निषेध केला.तिरुचिरापल्ली रेल्वे विभागीय कार्यालयाच्या प्रवेशद्वाराला अलीकडेच 'कर्तव्यद्वार' असे नाव देण्यात आले. त्यामुळे तमिळनाडूमध्ये हिंदी भाषा लादण्यावरून राजकीय वाद निर्माण झाला आहे. या निर्णयावर तीव्र आक्षेप घेत, मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी दावा केला की, केंद्रातील भाजप सरकारने 'एक भाषा, तीन लिपी' या बहाण्याने तमिळ आणि इंग्रजीमध्ये हिंदी नाव लिहिण्याच्या माध्यमातून हिंदी भाषा लादण्याची घृणास्पद मोहीम सुरू केली आहे.

---

### राज्यसभेवरुन शिंदेसेनेत नाराजीनाट्य

**मुंबई :** राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरायला अवघे काही तास राहिलेले असताना शिंदेसेनेनं ज्योती वाघमारे यांना उमेदवारी जाहीर केली. पक्षातील वरिष्ठांना, दिग्गजांना मागे टाकून वाघमारेंनी राज्यसभेचं तिकीट मिळवलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यानंतर शिंदेसेनेत नाराजीनाट्य पाहायला मिळत आहे. माजी खासदारानं याबद्दल मनातील खदखद बोलून दाखवली आहे. राज्यातील राज्यसभेच्या ७ जागा रिक्त होत आहेत. यासाठी ४ पक्षांकडून ७ नावं जाहीर करण्यात आली आहेत. ७ जागांसाठी ७ उमेदवार रिंगणात असल्यानं निवडणूक बिनविरोध होईल.

---

### 'पीएनबी'ने बदलले नियम

**मुंबई :** पंजाब नॅशनल बँकेने त्यांच्या काही डेबिट कार्डसाठी दररोज एटीएममधून पैसे काढण्याची मर्यादा ५०% पर्यंत कमी केली आहे. ही नवीन मर्यादा १ एप्रिल २०२६ पासून लागू होईल. बँकेने सांगितले की हे पाऊल जोखीम नियंत्रण मजबूत करण्यासाठी, ग्राहकांची सुरक्षा वाढविण्यासाठी आणि सुरक्षित डिजिटल बँकिंगला प्रोत्साहन देण्यासाठी उचलण्यात आले आहे. याचा परिणाम अनेक प्रीमियम आणि विशेष पीएनबी डेबिट कार्डवर होईल.काही कार्डे पूर्वी दररोज १ लाखांपर्यंत रोख काढण्याची परवानगी देत २असत, परंतु आता ही मर्यादा ५०,००० पर्यंत कमी केली जाईल. त्याचप्रमाणे, काही हाय-एंड कार्ड्समध्ये १.५ लाखांवरून ७५,००० पर्यंत कमी केली जाईल. इतर सर्व डेबिट कार्ड्ससाठी मर्यादा अपरिवर्तित राहतील. शिवाय, पीओएस, ई-कॉमर्स आणि कॉन्टॅक्टलेस व्यवहारांसाठी मर्यादा समान राहतील.

---

### तिरुअनंतपुरम : १६ हजार किलो सोने एकाच सोनाराकडे

केरळच्या त्रिशूर येथील रस्त्याच्या बाजूला फक्त २०० चौरस फूट आकाराचे दागिन्यांचे छोटे दुकान होते. या दुकानातून एका मुलाची कहाणी सुरू झाली ज्याने नंतर भारतातील सर्वात मोठे दागिन्यांचे साम्राज्य उभारले. वडिलांसोबत छोट्या दुकानात काम करणाऱ्या या मुलाच्या तिजोरीत आता हजारो किलो सोन्याचा भांडार असून ब्रँड जगभरात ओळखला जातो.आज हा मुलगा जॉय अलुक्कास म्हणून ओळखला जातो, जो भारतातील सर्वात श्रीमंत ज्वेलर्सपैकी असून मार्च २०२६ मध्ये दिलेल्या मुलाखतीत आपल्याकडे अंदाजे १६००० किलो सोन्याचा साठा असल्याचे उघड केले.

---

### ट्रम्प करणार मोठी घोषणा ?

**नवी दिल्ली :** अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफला 'बेकायदेशीर' असल्याचे सांगितल्यावर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी १०% सार्वत्रिक आयात शुल्क लागू केले होते, पण आता टॅरिफच्या दरात लवकरच पुन्हा एकदा मोठी वाढ करण्याची तयार सुरु आहे. इराणमध्ये इस्त्रायलच्या साथीने हल्लाबोल करणारे डोनाल्ड ट्रम्प आता जगावर पुन्हा एकदा टॅरिफ 'बॉम्ब' टाकायची तयारी करत आहेत. अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसंट यांनी अमेरिका लवकरच १०% सार्वत्रिक आयात शुल्क १५% पर्यंत वाढवू शकते असे संकेत दिले आहेत.

---

### चिनी अर्थव्यवस्थेला घरघर!

**बीजिंग :** मिडल ईस्टमध्ये अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील तणावादरम्यान जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था चीनमधून तणाव वाढवणारी बातमी समोर आली आहे. चीनने २०२६ मध्ये जीडीपी विकास दर तीन दशकांहून अधिक काळातील सर्वात कमी पातळीवर राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. जगातील दुसरी मोठी अर्थव्यवस्था सध्या अनेक बाह्य आणि अंतर्गत प्रतिकूल परिस्थितींमुळे गेल्या काही वर्षांपासून मंदावत आहे.

# युद्धामुळे तेलचटके! भारतात कच्च्या तेलाच्या किमतींत वाढ, पेट्रोल-डिझेल महागणार?

**नवी दिल्ली :** इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने अनेक तेलवाहू जहाजांची कोंडी झाली आहे. त्याचा परिणाम जागतिक बाजारपेठेत तेलाच्या दरांवर झाला आहे. कच्च्या तेलाचे दर ८४ डॉलर प्रतिपिंप एवढे झाले आहेत. युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या पाच दिवसांत तेलाच्या दरांमध्ये १५ टक्के वाढ झाली आहे.




अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात पेटलेल्या युद्धाची झळ कच्च्या खनिज तेलाच्या (क्रूड) दरांना बुधवारी लागली. त्याचवेळी कतारने द्रवीभूत नैसर्गिक वायूचे (एलएनजी) उत्पादन थांबवल्याचे बुधवारी जाहीर केले. यामुळे भारतात या इंधनाच्या पुरवठ्यावर परिणाम होणार आहे. याची थेट झळ औद्योगिक आणि नागरी क्षेत्रांना बसणार आहे. हे युद्ध माहिनाभर किंवा त्यापेक्षा अधिक काळ सुरू राहू शकते, असा इशारा ट्रम्प यांनी दिल्यामुळे जागतिक बाजारात भीतीचे वातावरण आहे.

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामध्ये कतारमधील प्रकल्पांवर हल्ले झाल्याने कतारने द्रवीभूत नैसर्गिक वायूचे उत्पादन थांबवले आहे. यामुळे भारताचा पुरवठा विस्कळीत झाला असून देशांतर्गत महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी एलएनजीची उपलब्धता कमी झाली आहे. कतारसोबतच्या दीर्घकालीन करारांवर अवलंबून असलेल्या भारताचा मालवाहू जहाजांचा पुरवठा तात्पुरता स्थगित करण्यात आला आहे. यामुळे औद्योगिक ग्राहक आणि नागरी गॅस वितरण कंपन्यांच्या पुरवठ्यात ४० टक्क्यांपर्यंत कपात झाली आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास खत कारखान्यांना मिळणारा गॅस महाग होईल, अशी चिंता क्रिसिलचे संचालक सेहुल भट्ट यांनी व्यक्त केली.

#### सीएनजीवरही सावट

कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस किंवा सीएनजीच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. काही औद्योगिक वापरकर्ते पर्यायी पण महागड्या इंधनाकडे वळू शकतात, मात्र सीएनजी विक्री करणाऱ्या कंपन्यांवर गंभीर ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सीएनजीची किंमत वाढेल. भारताच्या एकूण वार्षिक २७ दशलक्ष टन एलएनजी आयातीपैकी ४० टक्के हिस्सा कतारचा आहे. पुरवठा कपातीमुळे चिंतेत असलेल्या शहरी गॅस कंपन्यांच्या संघटनेने केंद्र सरकारची कंपनी गेलला पत्र लिहिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, स्वस्त गॅसच्या पुरवठ्यात ६० टक्क्यांपर्यंत कपात आणि स्पॉट मार्केटमधील पुरवठा शून्यावर आल्याने घरगुती पाइप गॅस आणि वाहनांच्या सीएनजी उपलब्धतेवर मोठा परिणाम होईल.

#### भारतीय तांदूळ अडकला

युद्धामुळे सुमारे चार लाख मेट्रिक टन भारतीय बासमती तांदूळ बंदरांवर आणि वाहतुकीत अडकला आहे. बासमतीचे निर्यातीचे नवीन सौदे पूर्णपणे थांबले आहेत, अशी माहिती व्यापारी अधिकाऱ्यांनी दिली. भारत हा सुगंधी आणि प्रीमियम बासमती तांदळाचा जगातील सर्वात मोठा निर्यातदार आहे. भारताच्या एकूण निर्यातीपैकी अर्ध्याहून अधिक वाटा सौदी अरेबिया, इराण आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) यांसारख्या मध्यपूर्वेतील देशांचा आहे.

# बिहारच्या राजकारणात पहिल्यांदाच भाजपचा मुख्यमंत्री होणार?

### मुख्यमंत्री नीतीश कुमार राज्यसभेवर

पटना : बिहारच्या राजकारणात आज एक अत्यंत मोठी आणि ऐतिहासिक घडामोड घडली आहे. मुख्यमंत्री नीतीश कुमार यांनी मुख्यमंत्रिपद सोडण्याचा आणि राज्यसभेवर जाण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे बिहारमध्ये प्रथमच भाजपचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

गेल्या दोन दशकांहून अधिक काळ बिहारच्या राजकारणाचे केंद्रस्थान राहिलेले नीतीश कुमार आता राज्याच्या राजकारणातून दिल्लीच्या राजकारणात प्रवेश करत आहेत. त्यांनी स्वतः सोशल मीडियाच्या माध्यमातून आपण राज्यसभेवर जाणार असल्याचे जाहीर केले आहे. या निर्णयामुळे बिहारच्या राजकारणात आता सत्तेचे नवे समीकरण आकारास येत आहे.

हिंदी भाषिक राज्यांमध्ये बिहार हे एकमेव असे राज्य होते जिथे अद्याप भाजपचा मुख्यमंत्री झाला नव्हता. नीतीश कुमार यांच्या राजीनाम्यानंतर भाजपचे आता हे स्वप्न पूर्ण होणार आहे. एनडीएच्या सूत्रानुसार, आता मुख्यमंत्रीपद भाजपकडे जाईल, तर जेडीयूच्या वाट्याला उपमुख्यमंत्रीपद येणार आहे. २०२५ च्या विधानसभा निवडणुकीत एनडीएच्या विजयानंतर नीतीश कुमार यांनी सन्मानाने पद सोडण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

नीतीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार हे आता बिहारचे नवे उपमुख्यमंत्री होऊ शकतात. निशांत कुमार विधान परिषदेच्या माध्यमातून मंत्रिमंडळात प्रवेश करतील. त्यांना पक्षातील वरिष्ठ नेत्यांचा पूर्ण पाठिंबा असल्याचे समजते. जेडीयू कोठ्यातून दुसऱ्या उपमुख्यमंत्रीपदासाठी विजय चौधरी आणि अशोक चौधरी (दलित चेहरा) यांची नावेही चर्चेत आहेत. नीतीश कुमार यांच्या या निर्णयामुळे जेडीयूच्या गोटात काही प्रमाणात नाराजी पाहायला मिळत आहे. आमदार दलाची बैठक न घेता इतका मोठा निर्णय घेतल्याने कार्यकर्ते नाराज आहेत. अशा महत्त्वाच्या निर्णयावर विधिमंडळ पक्षात चर्चा होणे गरजेचे होते, असे काही आमदारांचे मत आहे. लवकरच या संदर्भात आमदार दलाची बैठक बोलावली जाण्याची शक्यता आहे.

# केवळ ५०० रुपयांत घडणार ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांचे दर्शन

### महिला दिनानिमित्त पुणेकरांना खास भेट

**पुणे :** जागतिक महिला दिन हा जगभरात महिलांच्या कर्तृत्वाचा आणि सन्मानाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून केवळ महिलांच्याच नव्हे, तर सर्व पुणेकरांच्या सुट्टीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. येत्या रविवारी, ८ मार्च २०२६ रोजी महिला दिनानिमित्त कडून विशेष पर्यटन बससेवा आयोजित करण्यात आली आहे.

पुणे दर्शन आता अधिक सुलभ

पुणे शहर हे ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाने नटलेले आहे. धावपळीच्या जीवनात अनेकांना या स्थळांना भेट देणे शक्य होत नाही. हीच अडचण ओळखून प्रशासनाने पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए () परिसरातील नागरिकांसाठी एकूण ८ विशेष पर्यटन बसगाड्यांचे नियोजन केले आहे. या बसगाड्यांच्या माध्यमातून शहराच्या वैभवाची ओळख पर्यटकांना करून दिली जाणार आहे.

#### केवळ ५०० रुपयांत पूर्ण दिवसाची सहल

मिळालेल्या माहितीनुसार, ही पर्यटन फेरी प्रति व्यक्ती ५०० रुपये दरात उपलब्ध असेल. यामध्ये ऐतिहासिक वास्तू, प्रसिद्ध मंदिरे आणि नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व पर्यटन बसगाड्या रविवार, ८ मार्च रोजी सकाळी ८ वाजता स्वारगेट मुख्य बसस्थानकातून मार्गस्थ होतील. जरी हा उपक्रम महिला दिनानिमित्त विशेषतः महिलांना डोळ्यासमोर ठेवून आखला असला, तरी ही सेवा सर्व वयोगटातील नागरिकांसाठी खुली आहे.

# अबीर गुलाल उधळीत रंग नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग

### नाथावाड्यात फुलांची उधळण करून फाग उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**पैठण दि ५ मार्च :-**

पैठण येथील श्रीसंत एकनाथ महाराजांच्या पावन भूमीत त्यांच्या राहत्याघरातील वाडा मंदिरात धुलीवंदनाचे औचित्य साधून मंगळवार दि.३ रोजी फाग उत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. यंदा रंगाऐवजी २० क्विंटल सुगंधित फुलांची उधळण करून एक आगळावेगळा आणि पर्यावरणपूरक धुलीवंदन सोहळा फाग उत्सव पार पडला असून.

उत्सवामध्ये मोठ्या प्रमाणावर भाविक महिला लहान बालकांनी सहभाग घेतल्यामुळे नाथमंदिर परिसर फुलून गेले होते.

या फाग उत्सवासाठी सुगंधित चैत्री गुलाब इंदूर, जालना आदी विविध भागांतून खास मागविण्यात आले होते. गुलालाची उधळण करण्यासाठी विशेष गुलाल देशातील विविध पवित्र तीर्थक्षेत्रांतून आणण्यात आला होता. द्वारका, नाथद्वारा, जगन्नाथ पुरी, वृंदावन, तिरुपती बालाजी मंदिर, कोल्हापूर तसेच कांची कामकोटी पीठ येथून आणलेला हा विशेष गुलाल प्रसादरूपाने भाविकांच्या अंगावर उधळण्यात आला.

यंदाच्या फाग उत्सवासाठी तब्बल १० क्विंटल फुलांचा वापर करण्यात आल्याची माहिती गोवत्स परिवाराच्या वतीने देण्यात आली. मागील आठ वर्षांपासून हा फाग उत्सव गोवत्स परिवारतर्फे सातत्याने साजरा केला जात असून. शालिवाहन परिवाराची दरवर्षी या कार्यक्रमासाठी भक्तीसेवा लाभते.



#### ''अबीर गुलाल उधळीत रंग नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग''

या सुरेल अभंगाच्या तालावर नाथ महाराज मंदिरात भक्तिरसाने न्हालेला कार्यक्रम पार पडला. शहरातील महिला-पुरुषांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवात सहभाग नोंदविला. यंदा बाहेरील जिल्ह्यांतूनही मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित राहिल्याचे संयोजकांनी सांगितले. फुलांच्या सुगंधाने दरवळलेला आणि भक्तिरसाने रंगलेला हा फाग उत्सव पैठणकरांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला.

# २० वर्षांनी तसंच घडतंय, मी पहिल्यांदा राज्यसभेत गेले तेव्हा बाळासाहेब हयात होते

### सुप्रिया सुळेंकडून बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा

**मुंबई, दि. ५ मार्च-**

ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आठवणींना उजाळा दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांचा आज राज्यसभेच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यात आला. अर्ज दाखल केल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आठवणींना उजाळा देत भावनिक प्रतिक्रिया दिली. आपण जेव्हा पहिल्यांदा राज्यसभेत गेलो तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांनी खुल्या मनाने पाठिंबा दिला होता. त्यामुळे ती निवडणूक बिनविरोध झाली होती, अशी आठवण सुप्रिया सुळे यांनी सांगितली. त्याचबरोबर आता शरद पवारांच्या ६ दशकांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीनंतर त्यांना पुन्हा राज्यसभेच्या उमेदवारीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून पाठिंबा मिळाला. त्यामुळे सुप्रिया सुळे यांनी उद्धव ठाकरे यांचे आभार मानले. २० वर्षांनी असा योगायोग आल्याचं त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी काँग्रेस पक्षाचेदेखील आभार मानले. काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांनी आपल्याला फोन केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

''मी उद्धव ठाकरे यांना भेटायला गेले होते. त्यानंतर मी आज संध्याकाळी साडेसहा वाजता पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी भेटायला जाणार आहे. उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे आणि संपूर्ण कुटुंबाला भेटायला जाणार आहे. त्याचबरोबर काँग्रेस पक्ष, काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, के. सी. वेणूगोपाल, मल्लिकार्जुन खर्गे, रमेश चेन्नीथला या सर्व नेत्यांचे मन:पूर्वक आभार मानते'', अशा भावना सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केल्या.

''मला मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, तुझ्या वडिलांनंतर केवळ दोन-तीन वर्षच मी राजकारणात उशिरा आलो. पण गेल्या सहा दशकांपासून आम्ही राजकारणात एकत्र आहोत. मला दिग्विजय सिंह यांचादेखील फोन आला. कमलनाथ यांचा फोन आला. ही सर्व ६ दशकांची प्रेमाची नाती आहेत. शरद पवार पुन्हा राज्यसभेत जात असल्याने या सर्वांना आनंद झाला. मी उद्धव ठाकरे यांचे आणि प्रत्येक शिवसैनिकाचे अंतःकरणातून आभार मानते'', अशादेखील भावना सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केल्या.

सुप्रिया सुळे यांच्याकडून बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा

''योगायोग बघा, मी २००६ मध्ये राज्यसभेत पहिल्यांदा गेले, त्यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे हयात होते. माझी निवडणूकदेखील बिनविरोध झाली होती. त्यानंतर २० वर्षांनी बाळासाहेब आपल्यात नाहीत, पण काँग्रेस पक्ष आणि शिवसेना, आता जे चित्र दिसतंय, महाराष्ट्राच्या सर्वच पक्षांनी सामंजसपणा दाखवलेला दिसतोय, निवडणूक बिनविरोध होईल, असं चित्र आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे सगळेच पक्ष सामंजसपणे आणि सुसंस्कृत महाराष्ट्राचे दर्शन होताना दिसत आहे'', असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. ''माजी दिवंगत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा जो महाराष्ट्र होता, त्यामध्ये विरोधक हा आपला शत्रू नव्हता, ही आपली वैचारिक लढाई आहे, असा विचार होता. हीच संस्कृती आज आपल्याला या निवडणुकीत दिसत आहे. आपल्या सगळ्यांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. हीच तर महाराष्ट्राची खरंच आण, बाण आणि शान आहे. महाराष्ट्राची संस्कृती जपवण्यासाठी सगळेच प्रयत्न करत आहेत. ही आनंदाची आणि समाधानाची गोष्ट आहे'', असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

बारामतीकरांचे नतमस्तक होऊन आभार मानते

''मी पुन्हा एकदा शिवसेना, काँग्रेस, महाविकास आघाडी, इंडिया आघाडीचे आभार मानते. काल अखिलेश यादव यांच्यासोबत बोलणं झालं. त्यांच्याही सहकार्याची भावना होती. गेल्या सहा दशकात या सगळ्या लोकांनी शरद पवार यांना साथ दिली. ते सर्व नेते आमच्याबरोबर या प्रक्रियेत सोबत होते. त्यामुळे सर्वांचे मी आभार मानते. मी बारामतीकरांचे नतमस्तक होऊन आभार मानते. कारण ही सगळी सुरुवात सहा दशकांपूर्वी फेब्रुवारीत १९६७ मध्ये झाली. मी विनम्रतेने सर्वांचे आभार मानते'', अशा भावना व्यक्त करत सुप्रिया सुळे यांनी सर्वांचे आभार मानले.

# महाराष्ट्रात धर्मांतरविरोधी कायदा मंजूर

**मुंबई :** बहुप्रतिक्षित धर्मांतर विरोधी कायदा अखेर मंजूर झाला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६वर अंतिम मोहोर उमटवण्यात आली. राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि प्रखर हिंदुत्ववादी नेते नितेश राणे यांनी गुरुवारी याबाबत माहिती दिली.

विधानभवन परिसरात माध्यमांना या ऐतिहासिक निर्णयाची माहिती देताना मंत्री नितेश राणे म्हणाले, ''निवडणुकीवेळी आम्ही वचन दिले होते की, महाराष्ट्रात सक्षम असा धर्मांतरविरोधी कायदा आणू. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तो शब्द पूर्ण केला आहे. हा कायदा अतिशय कठोर आणि हिंदू भगिनींना न्याय देणारा असेल'' असे राणे यांनी नमूद केले.

''यापुढे कोणत्याही हिंदू भगिनीकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही. मिशनऱ्यांकडून होणारे धर्मांतर किंवा लव्ह जिहादसारखे प्रकार आता खपवून घेतले जाणार नाहीत.

ज्या कार्यकर्त्यांनी यासाठी मोर्चे काढले, संघर्ष केला आणि काहींनी प्राणांचे बलिदान दिले, त्या सर्वांच्या संघर्षाचा आज खऱ्या अर्थाने विजय झाला आहे,'' अशा शब्दांत नितेश राणे यांनी भावना व्यक्त केल्या. या कायद्याचा शासन निर्णय (जीआर) पुढील काही तासांतच निर्गमित होणार असून, त्यानंतर याच्या अंमलबजावणीला राज्यात सुरुवात होईल. दरम्यान, या कायद्याच्या सविस्तर तांत्रिक तरतुदींबाबत मुख्यमंत्री आणि संबंधित खात्याचे मंत्री अधिकृत माहिती देणार असल्याचेही राणे यांनी स्पष्ट केले.

**कठोर अंमलबजावणी**

या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल्यास आरोपीला जामीन मिळणे (अजामीनपात्र) कठीण होणार आहे. - संविधानिक चौकट : सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा आधार घेऊन आणि कायदेशीर बाबींचा सखोल अभ्यास करून हा मसुदा तयार करण्यात आला आहे. - घरवापसीचा मार्ग मोकळा : धर्मांतरित झालेल्या व्यक्तींना पुन्हा स्वधर्मात (हिंदू धर्मात) यायचे असल्यास त्यांना या कायद्यान्वये कायदेशीर संरक्षण व मदत दिली जाणार आहे. - मिशनरी व सामूहिक धर्मांतरावर चाप : दबावापोटी किंवा प्रलोभन दाखवून होणाऱ्या सामूहिक धर्मांतराच्या प्रकरणांत आता थेट पोलीस कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## महत्वाचे...

### टोयोटा किर्लोस्कर मोटरने ३४ हजार ३४ वाहनांची विक्री नोंदवली

**छत्रपती संभाजीनगर :-** टोयोटा किर्लोस्कर मोटरने (टीकेएम) आज फेब्रुवारी २०२६ महिन्यातील विक्रीचा अहवाल जाहीर केला. या महिन्यात कंपनीने एकूण ३४,०३४ वाहनांची विक्री केली, तर फेब्रुवारी २०२५ मध्ये कंपनीने २८,४१४ वाहनांची विक्री केली होती. २०२६ मधील या एकूण विक्रीपैकी ३०,७३७ वाहने देशांतर्गत बाजारात विकली गेली, तर ३,२९७ वाहनांची निर्यात करण्यात आली.फेब्रुवारी २०२५ च्या तुलनेत फेब्रुवारी २०२६ मध्ये विक्रीत चांगली वाढ झाली आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये देशांतर्गत विक्री २६,४१४ युनिट्सवरून ३०,७३७ युनिट्सपर्यंत वाढली असून यात १६% वाढ झाली आहे. निर्यात २,००० युनिट्सवरून ३,२९७ युनिट्सपर्यंत वाढली असून ६५% वाढ झाली आहे. एकूण विक्री २८,४१४ युनिट्सवरून ३४,०३४ युनिट्सपर्यंत वाढली असून २०% वाढ झाली आहे.

------------------------------------

### जागतिक परिषदेत गुरचरण दास यांना लाईफटाईम लिबर्टेरियन पुरस्कार जाहीर

**मुंबई :-** प्रसिद्ध भारतीय लेखक आणि प्रख्यात विचारवंत गुरचरण दास यांना प्रतिष्ठेचा लाईफटाईम लिबर्टेरियन पुरस्कार जाहीर झाला आहे. नेपाळमधील काठमांडू येथे ७ ते ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित केल्या जाणाऱ्या ४० व्या लिबर्टी इंटरनॅशनल वर्ल्ड कॉन्फरन्समध्ये त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात येईल.२०२४ मध्ये या पुरस्काराची जागतिक स्तरावर सुरुवात करण्यात आली. तेव्हापासून हा पुरस्कार मिळवणारे गुरचरण दास हे पहिलेच भारतीय ठरले आहेत. जगभरात स्वातंत्र्याच्या प्रसारासाठी ज्या व्यक्तींच्या विचारांनी आणि नेतृत्वाने चिरकाल टिकणारे योगदान दिले आहे, अशा व्यक्तींचा या पुरस्काराने गौरव केला जातो.गेल्या तीन दशकांतील भारताच्या आर्थिक वाटचालीवरील सार्वजनिक चर्चा आणि देशाच्या विकासाला आकार देणाऱ्या विचारांमधील गुरचरण दास यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची या सन्मानामुळे दखल घेण्यात आली आहे.

------------------------------------

### आयआयएसईआर ॲप्टिट्यूड टेस्ट (आयएटी) २०२६ ची नोंदणी ५ मार्चपासून सुरू

**पुणे :-** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च द्वारे आयआयएसईआर ॲप्टिट्यूड टेस्ट ( आयएटी ) २०२६ साठी अर्ज मागवण्यात येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी सर्व कॅम्पसमध्ये पदवीपूर्व अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी ही एकमेव आणि अनिवार्य प्रवेश परीक्षा आहे.ऑनलाइन अर्ज प्रक्रिया ५ मार्च २०२६ (गुरुवार) पासून सुरू होईल आणि ही कलचाचणी७ जून २०२६ (रविवार) रोजी घेतली जाईल.विज्ञानाची ओढ असणारे विद्यार्थी आता या महत्त्वाच्या परीक्षेसाठी नोंदणी करू शकतात, ज्याद्वारे सातही आयआयएसईआर कॅम्पसमध्ये जागतिक दर्जाच्या संशोधन प्रशिक्षणाचे दरवाजे उघडले जातील. आयआयएसईआर या भारत सरकारद्वारे स्थापित केलेल्या प्रमुख स्वायत्त संस्था असून, उच्च दर्जाचे मूलभूत विज्ञान शिक्षण आणि संशोधनाला चालना देणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे.

------------------------------------

### ॲथलीजर आणि स्पोर्ट्सवियर झोन सादर

**अहिल्यानगर :-** फिनिक्स मार्केटसिटी पुणे आता शहरातील स्पोर्ट्स आणि ॲथलीजर खरेदी अनुभव आणखी सोपा आणि आनंददायी बनवत आहे, कारण अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे स्टोअर्स आता एका ठिकाणी उपलब्ध आहेत. यामध्ये नाइकी, ॲडिडास, असिक्स, स्केचर्स यांचे प्रमुख फ्लॅगशिप स्टोअर्स आहेत, तसेच न्यू बॅलन्स, रिबॉक, प्यूमा, एक्सस्टेपसारखे ब्रँड्स देखील येथे आहेत. या नवीन झोनमुळे पुण्यातील खरेदीदारांना स्पोर्ट्स आणि ॲथलीजर उत्पादनांचे अनेक पर्याय एकाच ठिकाणी मिळतात. फिनिक्स मार्केटसिटीने या झोनच्या माध्यमातून पुण्यातील वाढती फिटनेस संस्कृती आणि बदलत्या ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन एक खास स्पोर्ट्स आणि ॲथलीजर झोन तयार केला आहे.

------------------------------------

### सुमनबाई मानकर यांचे निधन



**सोयगाव, दि.५ मार्च**

सुमनबाई एकनाथ मानकर (वय.६२) रा.किन्ही,तालुका जामनेर यांचे दि.४ बुधवार रोजी रात्री ९:३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचेवर गुरुवार रोजी सकाळी १०:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती,दोन मुले,एक मुलगी,सुन,नातवंडे असा परिवार आहे.कळमसरा तालुका पाचोरा जिल्हा-जळगाव येथील आमोल बोखारे यांच्या त्या मावशी होत.

# संत एकनाथ महाराजांच्या नावाने दिले जाणारे यंदाच्या वर्षीचे पुरस्कार जाहीर

## पैठणला १० मार्चला वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पैठण, दि ५ मार्च-**

पैठणच्या वारीत नाथषष्ठीचे औचित्य साधत, शांतिब्रह्म श्रीएकनाथ महाराजांच्या नावाने गेल्या अनेक वर्षांपासुन विविध पुरस्कार देण्यात येतात. हे पुरस्कार शांतिब्रह्म श्रीएकनाथमहाराज मिशन, पैठण व नाथवंशज योगिराज महाराज पैठणकर यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येतात.

यातील प्रथम क्रमांकाचा ''भानुदास एकनाथ पुरस्कार २०२६'' हा महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार गोसेवक विदर्भरत्न हभप श्री संजयमहाराज पाचपोर यांना जाहीर झाला असुन ताम्रपट, रुपये पंचवीस हजार, एकनाथ महाराजांची मूर्ती, एकनाथी भागवत, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



'श्रीएकनाथ संस्थानाधिपती वै.हभप श्री भैय्यासाहेब महाराज पैठणकर वारकरी भूषण पुरस्कार' नामवंत कीर्तनकार तथा एकनाथ महाराजांच्या शिष्य परंपरेचे पाईक बीड येथील हभप श्री अमृताश्रम स्वामी महाराज (जोशी बाबा) यांना, 'श्रीसंत एकनाथ महाराज प्रबोधमार्तंड पुरस्कार' अहिल्यानगर येथील जेष्ठ कीर्तनकार हभप श्री प्रमोद महाराज जगताप यांना, 'श्रीसंत एकनाथ महाराज स्वरमार्तंड पुरस्कार' अभिनवगंधर्व पं.श्री रघुनाथजी खंडाळकर यांना, 'श्रीसंत एकनाथ महाराज तालमार्तंड पुरस्कार' प्रसिद्ध तबलावादक श्री पांडुरंग पवार यांना तर 'श्रीसंत एकनाथ महाराज वारकरी सेवा पुरस्कार' पुणे येथील गोसेवक श्री संजयबापु बालवडकर यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळींची उपस्थिती असणार आहे.

सदरील कार्यक्रम श्रीसंत नरहरी सोनार धर्मशाळा, नाथगल्ली, पैठण येथे दिनांक १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता संपन्न होईल. कार्यक्रमानंतर भोजन प्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी या कार्यक्रमाचा सर्वांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य संयोजक नाथवंशज श्री योगिराज महाराज पैठणकर यांनी केले आहे.

## संस्कारयुक्त शिक्षणातून सक्षम पिढी घडवा : जिल्हाधिकारी स्वामी

**छत्रपती संभाजीनगर -** आजचा विद्यार्थी हा समाजाचा भविष्यातील कणा असल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वात चांगले संस्कार, मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी रुजविणे अधिक म हत्त्वाचे आहे. शिक्षक व पालकांनी मिळून त्यास योग्य दिशा देणे आवश्यक आह, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज फुलंब्री येथे केले.

राजर्षी शाहू महाविद्यालय, फुलंब्री येथे तालुकास्तरीय महिला सक्षमीकरण व संवाद कार्यशाळा संपन्न झाली. उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसीलदार योगिता खटावकर, संस्थेचे अध्यक्ष द्वारकाभाऊ पाथ्रीकर, उपाध्यक्ष राजेंद्र पाथ्रीकर, सचिव उषाताई पाथ्रीकर, जिल्हा परिषद सदस्य गीतांजली पाथ्रीकर, सहसचिव वरुण पाथ्रीकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, गट शिक्षणाधिकारी क्रांती धसवाडीकर, शिक्षण विस्तार अधिकारी राजेश महाजन आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सचिन मोरे यांनी केले.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, शिक्षकांनी आपल्या पदाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. विद्यार्थ्यांकडून नेहमीच शंभर टक्के गुणांची अपेक्षा ठेवणे योग्य नाही, तर त्यांच्या क्षमतेनुसार त्यांना घडविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## श्री नाथषष्ठी महोत्सव प्रवचन मालेचे आयोजन

**संभाजीनगर, दि ५ मार्च-**

श्री.एकनाथ संशोधन मंदिर खडकेश्वर संस्थेच्या वतीने श्री नाथषष्ठी महोत्सव २०२६ श्री चैतन्य महाराज देगलूरकर यांचे प्रवचनमाला दि.८ ते १० मार्च ३ दिवस श्रीसमर्थ राम मंदिर सभागृह समर्थ नगर येथे आयोजित करण्यात आली आहे. भविकांनी लाभ घेण्याचे आवाहन अतुल कुलकर्णी कार्याध्यक्ष व सचिव श्यामल भोगले यांनी केले आहे.

# एसटीत मद्यपानास शून्य सहनशीलता; चालक-वाहकांची अल्कोटेस्ट तपासणी सक्तीची

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई :-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सेवेत असताना मद्यपानास आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे दररोज म द्यपान तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून, योग्य नोंदी घेऊनच चालकांना कर्तव्यावर पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

२५ जानेवारी रोजी मंत्री सरनाईक यांनी मुंबईतील परळ बसस्थानकाला अचानक भेट दिली. यावेळी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये अनेक मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. तसेच काही कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले. या धक्कादायक प्रकाराची गंभीर दखल घेत मंत्री सरनाईक यांनी तातडीने चौकशी समिती नेमून या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगितले होते.

त्या अनुषंगाने एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजनाही सुचविण्यात आल्या आहेत. सदर चौकशी अहवाल एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना सादर करण्यात आला असून त्यांच्या निर्देशानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. तसेच समितीने सुचविलेल्या उपाययोजना तातडीने सर्व आगारांमध्ये लागू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

नव्या उपाययोजनांनुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या चालकांची वाहन परीक्षकांच्या म ाध्यमातून नियमित तपासणी केली जाणार आहे. तसेच वाहकांचीही ड्युटी देण्यापूर्वी अल्कोटेस्ट म शीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे. चालक व वाहकांची म द्यपान तपासणी झाली आहे की नाही, यावर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आगार व्यवस्थापकांनीही नियमित नियंत्रण ठेवून या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## हर मास एक उपवासचा चौथा सामूहिक उपवास कार्यक्रम ७ मार्चला नीमच येथे आयोजित

**छत्रपती संभाजीनगर -**

पतंजलि योगपीठ हरिद्वार तसेच अंतर्मना धार्मिक एवं पारमार्थिक न्यास यांच्या तत्वावधानाखाली आयोजित साधना महोदधि कार्यक्रमात अंतर्मना आचार्य श्री १०८ प्रसन्न सागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात हर मास एक उपवास या चौथ्या सामूहिक उपवास कार्यक्रमाचे आयोजन नीमच (म.प्र.) येथे होणार आहे.



या उपक्रमांतर्गत दिगंबर जैन संत अंतर्मना आचार्य श्री समाजातील प्रत्येक घटकाला उपवासाचे महत्त्व व त्याचे आरोग्यदायी आणि आध्यात्मिक लाभ यांविषयी मार्गदर्शन करतात. शक्य असल्यास दर महिन्याला एक दिवस उपवास करण्याचा संकल्प करवून घेतला जातो.

प्रवक्ते रोमिल पाटणी सोनकच्छ नरेंद्र अजमेरा, पीयूष कासलीवाल औरंगाबाद यांनी माहिती दिली की हा कार्यक्रम अटल बिहारी वाजपेयी टाउन हॉल, दशहरा मैदानाजवळ, नीमच येथे सकाळी ८:३० ते ११:३० या वेळेत आयोजित केला जाईल. या प्रसंगी संगीत व कवी संमेलनाचे आयोजन करण्यात येणार असून, पूज्य गुरुदेव, श्री अंबाजी धाम, निपानिया तसेच पूज्य महामंडलेश्वर स्वामी सुरेशानंद जी महाराज हे विशेष उपस्थित राहून भक्तांना आशीर्वाद देतील. काव्यपठणासाठी टीव्ही स्टार सुदीप मोला तसेच प्रसिद्ध बासरीवादक विक्रम कनेरिया आणि देव कनेरिया आपली प्रस्तुती देतील. संयोजक मंडळात एस. के. तिजारावाला (हरिद्वार) प्रवक्ते, स्वामी रामदेव यांचे प्रतिनिधी, आकाश जैन (समन्वयक), अंतर्मना धार्मिक एवं पारमार्थिक न्यास, तसेच हर मास एक उपवास नीमचचे पदाधिकारी विजय कुमार विनायक, अजय कासलीवाल, जितेंद्र जैन बंटी, महेश कुमावत उपस्थित राहणार आहेत ।अशी माहिती रोमिल जैन नरेंद्र अजमेरा, पीयूष कासलीवाल सप्तम जैन सूरे द्र जैन मनिष जैन विपुल जैन नितेश पाटनी विकल्प जैन यानी दिली.

### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४२/२०२६.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद**

**१) सावित्रीबाई तुकाराम चौधरी,** वय - ८५ वर्षे, धंदा - घरकाम,
**२) प्रकाश तुकाराम चौधरी** वय - ५८ वर्षे, धंदा - शेती,
**३) अशोक तुकाराम चौधरी** वय - ७३ वर्षे, धंदा - शेती,
**४) संजय तुकाराम जावळे** वय - ४९ वर्षे, धंदा - शेती,
**५) सुरेश तुकाराम चौधरी** वय - ४७ वर्षे, धंदा - शेती,
सर्व रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद — **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही - गैरअर्जदार**

**प्रकरण :- वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत**

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड.वाय.आर,जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत तुकाराम विठोबा चौधरी हे दि. ०७/०८/२०२१ रोजी मोजे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत तुकाराम विठोबा चौधरी यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख: ०४/०४/२०२६,

आज दि. २७/०२/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

सही/- विभागीय लिपीक, (दिवाणी न्यायालय,क. स्तर, सोयगांव) | कोर्टाचा शिक्का | सही/- सहाय्यक अधीक्षक (न्यायालय, क स्तर,सोयगांव)

### चौकशीची जाहीर नोटीस

**अर्ज क्रमांक :-** १०१६/२०२५ कलम-किरकोळ विलंब
**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय** : छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक:** श्री संत सावता समाज विकास मंडळ, माळीवाडगाव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद. नोंदणी क्रमांक एफ-७८३० (औ) बाबत,
**अर्जदार:-** शेषराव भावराव जाधव, रा. मु.पो. माळीवाडगाव, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.

सर्व संबधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उप आयुक्त छ. संभाजीनगर विभाग,छ.संभाजीनगर हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्दांवर चौकशी करणार आहेत :-

१. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

स्थावर मिळकत :- (वर्णन)

न्यासाने मौजे माळीवाडगाव. ता. गंगापुर, जि. औरंगाबाद येथील गट नं. २३७ मधील क्षेत्रफळ ३ हेक्टर ११ आर पैकी लिहुन देणार- श्रीमती करुणाबई विठ्ठल गायके यांच्या मालकी व ताब्यातील जमीन फक्त ५० आर. चर्तुःसीमाः पूर्वेस :- पुंजाबा धोंडीबा रावते यांचे शेत, पश्चिमेस :- सुभाष रुंजाबा यांचे शेत, दक्षिणेस : उत्तम लाल्या यांचे शेत, उत्तरेस :- सरकारी रस्ता. खरेदी किंमत : रु.३२,०००/- (रु. बत्तीस हजार फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपआयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्क्यानिशी आज दि.०२/०३/२०२६ रोजी दिली.

सही/-
अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

दि.कि. अर्ज क्र १४०/२०२६

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

**१) प्रियंका राजेंद्र शेलार,** वय - ३४ वर्षे, धंदा - शेती रा. आनंतपूर लासुर स्टेयान, ता. गंगापुर जि. औरंगाबाद
**२) वेदिका राजेंद्र शेलार** वय - १२ वर्षे, धंदा - शिक्षण अ.पा.कर्ती आई अर्जदार क.१
**३) शिवाय राजेंद्र शेलार** वय - ७ वर्षे, धंदा - शिक्षण अ.पा. कर्ती आई अर्जदार क.१
**४) मिनाबाई श्रीहरी शेलार** वय - ५७ वर्षे, धंदा - शेती, रा. आनंतपूर लासुर स्टेयान, ता. गंगापुर जि. औरंगाबाद — **अर्जदार**

विरूध्द

**गैरअर्जदार - निंरक**

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ व ३ चे वडील तसेच अर्जदार क. ४ चा मुलगा राजेंद्र श्रीहरी शेलार हे दि. २८/०७/२०२१ रोजी आनंतपूर, ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत. मयतांना अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत राजेंद्र श्रीहरी शेलार यांना अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत राजेंद्र श्रीहरी शेलार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या

कोर्टाचा शिक्का | सही/- सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, क. स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४९/२०२६

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

**१) अंजनाबाई नामदेव लहाने** वय - ८६ वर्षे, धंदा - घरकाम
**२) सुखदेव नामदेव लहाने** वय - ६४ वर्षे, धंदा - शेती,
**३) रामचंद्र नामदेव लहाने** वय - ५० वर्षे, धंदा - शेती, सर्व रा. तितुर, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,
**४) मिना कैलास पाटील** वय - ५२ वर्षे, धंदा - घरकाम, रा. पिंपळगांव बु., ता. पाचोरा, जि. जळगांव.
**५) विठाबाई नारायण पाटील,** वय - ६२ वर्षे, धंदा - घरकाम रा. खेडगांव, ता. पाचोरा, जि. जळगांव.
**६) कलाबाई बळीराम पाटील** वय - ५७ वर्षे, धंदा - घरकाम, रा. पिचर्डे, ता. भडगांव, जि. जळगांव,
**७) लिला राजु पवार** वय - ५४ वर्षे, धंदा - घरकाम रा. वडगांवकडे, ता. पाचोरा, जि. जळगांव. — **अर्जदार**

विरुध्द

**गैरअर्जदार - कोणीही नाही**

**प्रकरण:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.वाय.आर.जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत नामदेव महादू लहाने हे दि. १५/१०/२०१४ रोजी मौजे. तितुर, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे त्यांचा मृत्यू झालेला असून, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ७ हे मयत नामदेव महादू लहाने यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख: ०४/०४/२०२६,

आज दि. २७/०२/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

सही/- विभागीय लिपीक, (दिवाणी न्यायालय,क.स्तर,सोयगाव) | कोर्टाचा शिक्का | सही/- अधिक्षक अधिक्षक (दिवाणी न्यायालय, क स्तर, सोयगाव)

### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३९/२०२६

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापूर यांचे न्यायालयात**

**१) प्रयागाबाई मुक्ताजी ढोले,**
**२) कृष्णा मुक्ताजी ढोले**
**३) गोपीचंद मुक्ताजी ढोले**
**४) छायाबाई चांगदेव घोडके** अर्जदार नं. १ ते ४स. टेंभापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद
**५) आशाबाई भाऊराव टाके** रा. अकोली वाडगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद
**६) काशाबाई आप्पासाहेब डरें** रा.माळी सागज, ता. वैजापूर जि. औरंगाबाद — **अर्जदार**

विरुध्द

**निरंक - गैरअर्जदार**

**प्रकरण:-वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ड. व्ही. जी. खाजेकर, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation ct VIII 1827 अन्वये बारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की. अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन मयत मुक्ताजी खंडेराव ढोले यांचा दि. 03/06/2016 रोजी मौजे टेंभापुरी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला आहे. तसेच मयत मुक्ताजी खंडेराव ढोले यांची आई नामे गोपाबाई खंडेराव ढोले आणि वडील नामे खंडेराव ढोले यांचा यापुर्वीच मृत्यु झालेला आहे. मयत मुक्ताजी खंडेराव ढोले आणि अर्जदार नं. १ हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. २ ते ६ यांचा जन्म झाला आहे. मयत मुक्ताजी खंडेराव ढोले यांना अर्जदार नं. १ते ६ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत मुक्ताजी खंडेराव ढोले यांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation ct VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितानी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक०५/०३/२०२६ रोजी दिले

पुढील तारीख ०७/०४/२०२६

सही/- कनिष्ठ लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन /सायटेशन नोटिस

सिव्हील एम ए.क्र. १०२/२०२६ प्रकरणात पुढील तरीख दि.२५/०३/२०२६

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

**१) लता भ्र. मलकु माने** वय - ५९ वर्ष, धंदा - घरकाम, रा. जामगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद.
**२) कृष्णा पि. मलकु माने** वय - ३६ वर्ष, धंदा - शेती रा. जामगांव ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.
**३) अनिता भ्र. मलकु माने** वय - ५८ वर्ष, धंदा - घरकाम रा. जामगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद
**४) शितल पि. मलकु माने** वय - २८ वर्ष, धंदा - घरकाम रा. जामगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद.
**५) आकाश पि. मलकु माने** वय - २७ वर्ष, धंदा - शेती रा. जामगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद — **अर्जदार**

विरुध्द

**गैरअर्जदार - निरंक**

**प्रकरण :- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ अन्वये लिगलहेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत**

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. एन. साबणे, गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे ठेकाणचे राहणारे असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ ची आई असुन अर्जदार क ३ हि अर्जदार क ४ व ५ यांची आई आहे म्हणजेच अर्जदार क १ व ३ हे सवत असुन अर्जदार क २, ४ व ५ हे आपसात भाउ व बहिन आहेत. अर्जदार क १ व ३ यांचे पति व अर्जदार क २, ४ व ५ यांचे वडील नामे मलकू बाबूराव माने हे दि.१२/०१/२०२६ रोजी मौजे जामगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले असुन मयत मलकू बाबूराव माने यांचे वडील नामे बाबूराव किसन माने व आई नामे वच्छलाबाई बाबूराव माने हे पुर्वीच मयत झालेले आहे. मयत मलकू बाबूराव माने यांना अर्जदार क १ हि प्रथम पत्नी व अर्जदार क २ हा प्रथम पत्नीचा मुलगा व अर्जदार क ३ हि द्वितीय पत्नी व अर्जदार क ४ व ५ हे द्वितीय पत्नीचे मुलगी व मुलगा असे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही मयत मलकू बाबूराव माने यांना अर्जदार क १ ते ५ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत मलकू बाबूराव माने यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा, त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन. दिले. आज दि.०४/०३/२०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

सही/- लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर पोलिसांकडून माणुसकीचे दर्शन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ५ फेब्रुवारी : पोलीस भरतीसाठी आलेल्या युवकांसाठी राहण्याची तसेच चहा-नाश्ता व अल्पोपहाराची व्यवस्था करून लातूर पोलीस दलाने आपल्या माणुसकीचे दर्शन घडविले आहे.

लातूर जिल्ह्यात सध्या पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई पदांच्या भरती प्रक्रियेचा महत्त्वपूर्ण टप्पा सुरू असून जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून हजारो तरुण मोठ्या उत्साहाने या प्रक्रियेत सहभागी होत आहेत. अंगावर खाकी वर्दी परिधान करून समाजसेवा करण्याचे स्वप्न डोळ्यांत साठवून हे युवक विविध मैदानी व कौशल्य चाचण्यांमध्ये उत्साहाने सहभागी होत आहेत. सदर भरती प्रक्रियेसाठी राज्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने उमेदवार लातूर येथे येत असल्याने त्यांच्या सोयीसुविधांचा विचार करून लातूर पोलिसांकडून भरती प्रक्रिया सुरू झाल्यापासूनच उमेदवारांसाठी राहण्याची तसेच स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

सध्या वातावरणातील वाढती उष्णता लक्षात घेता उमेदवारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये तसेच भरती प्रक्रिया सुरक्षित व सुरळीत पार पडावी यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पोलिस भरती प्रभारी अधिकारी मंगेश चव्हाण, अपर पोलिस अधीक्षक यांना सूचना दिल्या. त्यावरून मंगेश चव्हाण यांनी सूचनेनुसार विशेष नियोजन केले होते. त्यानुसार पहाटे पाच वाजल्यापासूनच मैदानी चाचण्यांना सुरुवात करून सकाळी ०९.०० वाजेपर्यंत सर्व चाचण्या पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे उमेदवारांना कडक उन्हाचा त्रास सहन करावा लागला नाही. लातूर पोलिसांकडून उमेदवारांसाठी सकाळी चहा-नाश्ता तसेच दुपारी स्नॅक्स/अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे.



## विविध वृत्त...

### 'रीड लातूर 'च्या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ५ मार्च : विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती जोपासली जावी आणि विद्यार्थ्यांमध्ये भाषिक तसेच सर्जनशील गुणांचा विकास व्हावा या उद्देशाने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधत 'रीड लातूर' या उपक्रमांतर्गत संस्थापक दीपशिखा देशमुख व धीरज देशमुख यांच्या संकल्पनेतून प्रकट वाचन, निबंध लेखन व काव्यलेखन स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेस लातूर, रेणापूर व औसा तालुक्यातील ८० जिल्हा परिषद शाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सुमारे ३००० विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला. यापैकी ८०० विद्यार्थी प्रथम, द्वितीय व उत्तेजनार्थ क्रमांकाने विजयी ठरले आहेत. विजेत्या विद्यार्थ्यांना रीड लातूर उपक्रम संस्थापकांच्या सहीचे प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धांचे आयोजन शालेय आणि स्तरावर करण्यात आले. गट १ (इ. १ ते ५), गट २ (इ. ६ ते ८) आणि गट ३ (इ. ९ व १०) अशा तीन गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. आवाजातील चढ-उतार, विरामचिन्हांची दखल, वाचनशैली आदी निकषांवर शालेय स्तरावर मूल्यमापन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे त्यांच्यातील भाषिक अभिव्यक्ती अधिक बळकट व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले. ही स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, मुख्याध्यापक, शिक्षक व शालेय व्यवस्थापन समिती यांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे उपक्रमाचे समन्वयक राजू पाटील यांनी नमूद केले. स्पर्धेत सहभागी व विजयी सर्व विद्यार्थ्यांचे रीड लातूर तर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

### अवैध दारू विक्री प्रकरणी गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

मुरुड दि. ५ मार्च : मुरुड बायपास परिसरात अवैध दारू विक्रीसाठी दारू साठवून ठेवलेल्या दोघांविरुद्ध मुरुड पोलीसांनी धाड टाकत ५१ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी मुरुड पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुरुड बायपासजवळील तुळजाभवानी मंगल कार्यालयासमोरील रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी विकास उद्धव गोडसे (वय ३४, रा. दत्तनगर, मुरुड) व संगमेश्र्वर चनबस कोरके (वय ४, रा. आरणी, ता. धाराशिव) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी नामांकित कंपनीच्या विदेशी दारूचा साठा जप्त केला आहे. तसेच आरोपींकडून दुचाकीही जप्त करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेस प्राधान्य द्यावे : आ. कराड

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ०५ मार्च : राज्य शासनाने नव्याने गठीत केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पांणद रस्ता विधानसभा क्षेत्र समितीची बैठक समिती अध्यक्ष लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झाली. मतदार संघात २५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम हाती घेतले जाणार असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ होईल अशा रस्त्यांना बळीराजा पाणंद रस्ते योजनेत प्राधान्य द्यावे अशी सूचना या बैठकीत आ. रमेशआप्पा कराड यांनी केली.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीतील मशागतीची कामे वेळेत व्हावीत, शेतमालाची सुलभ वाहतूक सुनिश्र्चित करण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना सुरू केली आहे.

शासन निर्णयानुसार विधानसभा क्षेत्र निहाय समिती गठीत करण्यात आलेली आहे. या लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची पहिली बैठक मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्र समिती अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांचे अध्यक्षतेखाली दि.०४ मार्च २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय लातूर येथे संपन्न झाली.

या बैठकीस मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्र समितीचे सचिव तथा लातूर उपविभागीय अधिकारी सौ. रोहिणी नऱ्हे, रेणापूर - औसा उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, औसा तहसीलदार घनश्यश्याम अडसळ, गटविकास अधिकारी सुमित जाधव, लातूरचे श्याम गोडभरले, औसा गटविकास अधिकारी आनंद मिरकले, भूमि अभिलेख अभियंता अशोक चव्हाण, सा. बा. उपअभियंता गोबाडे, जिप बा. उप अभियंता एस जी कुलकर्णी, लेखा अधिकारी डी. एस. डांगे, कृषी अधिकारी एस. जी. कांबळे, दत्तात्र्य हाके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




सदर बैठकीत आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील सर्व रस्त्यांची माहिती घेतली. पहिल्या टप्प्यात एकूण २५ किलोमीटर लांबीच्या रस्ते कामात रेणापूर तालुका दहा, लातूर तालुका दहा आणि औसा तालुका पाच किलोमीटरचे काम करण्यात यावे. लातूर ग्रामीण मतदार संघात यापुर्वी झालेल्या शेत आणि पाणंद रस्त्यांची माहिती अद्यापपर्यंत कोणत्याही योजनेमधुन रस्त्यांची कामे झालेली नाही अश्या सर्व रस्त्यांची माहिती संकलीत करण्यात यावी. ज्या ठिकाणी सदर शासन निर्णयानुसार रस्ता मजबुतीकरण करावयाचे आहे अशा रस्त्यांचे अतिक्रमण पोलिस विभाग व महसूल विभागाच्या समन्वयाने करावे. सदर रस्त्यांचे सिमांकन भुमी अभिलेख विभागाने तात्काळ करून देण्यात यावे अशा सुचना दिल्या.

येत्या काळात सुरू होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियाना अंतर्गत शासनाच्या विविध योजनेचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचला पाहिजे यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. शेतकरी सन्मान योजना, लाडकी बहीण योजना, निराधारांच्या पगारी यासह विविध योजनेचा लाभ मिळत असताना अनेक लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत आहेत. तेव्हा त्यांच्या त्रुटी दूर करण्याचे काम तातडीने करावे गायगोठे, विहिरी यासह विविध वैयक्तिक लाभाच्या योजनेबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी येत असल्याबाबत नाराजी व्यक्त करून कोणाचीही अडवणूक आणि पिळवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी अशा कडक शब्दात आ. रमेशआप्पा कराड यांनी बैठकीत सूचना दिल्या.

प्रारंभी समिती सचिव तथा उपविभागीय अधिकारी सौ. रोहिणी नऱ्हे यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत /पांदन रस्ता योजने संदर्भात शासन निर्णयाची सविस्तर माहिती देऊन लातूर रेणापूर तालुक्यासह भादा सर्कल मध्ये एकूण ११४३ विविध शेत पांणद रस्ते असून त्यात गाव नकाशावर नोंद असलेले रस्ते ७६८ आणि नोंद नसलेले ३७५ रस्ते असल्याची माहिती दिली. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी विद्यार्थी महिला यांच्या महसूल विभागाशी निगडित प्रलंबित प्रश्र्न तात्काळ निकाली काढण्यासाठी येत्या मार्च ते मे दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. तहसीलदार यांनी कोणती रस्ते खुले असून कोणते रस्ते अतिक्रमीत आहेत याबाबत माहिती दिली.

सदर योजनेअंतर्गत रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानाअंतर्गत करण्यात यावा त्यादृष्टीने सर्वांनी तयारी करावी तसेच सदर रस्त्यांची निवड करताना रस्त्यांची स्थिती, आवश्यकता व गाव भेटी व शिवार भेटी आयोजित करून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून निश्र्चिती करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश आ. कराड यांनी दिले.

## महिलांच्या गळ्यातील दागिने चोरी करणाऱ्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ५ मार्च : लातूर जिल्ह्यातील विविध बसस्थानक परिसरात प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी प्रभावी कारवाई करत एका महिला आरोपीस अटक केली आहे. तिच्याकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे औसा, शिरूर ताजबंद व अहमदपूर येथील बसस्थानक परिसरात घडलेल्या चोरीच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत.




लातूर जिल्ह्यातील मालमत्तेविषयक गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथक सातत्याने गस्त व माहिती संकलन करत असताना दि. ४ मार्च २०२६ रोजी रेणापूर नाका, लातूर येथील नवीन बसस्थानक परिसरात दोन संशयित महिला बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीत संशयास्पद हालचाली करत असल्याची माहिती मिळाली . सदर माहितीची खात्री करून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचांना सोबत घेऊन सापळा रचण्यात आला. त्यावेळी संशयास्पद हालचाल करणाऱ्या पुनम जितू कांबळे (वय ३४ वर्षे, रा. गांधीनगर, उदगीर, जि. लातूर या महिलेस पाण्यात घेण्यात आले.

महिला पोलीस अंमलदारामार्फत तिची अंगझडती घेतली असता तिच्याकडून एक सोन्याचे मणी मंगळसूत्र व एक सोन्याची साखळी असा अंदाजे १३ ग्रॅम ३९० मिली वजनाचा व सुमारे ७८ हजार ९५१ रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आला.

सदर दागिन्यांबाबत अधिक चौकशी केली असता आरोपी पुनम कांबळे हिने तिची साथीदार अनिता विशाल कांबळे हिच्यासह मागील चार ते पाच महिन्यांपासून औसा, शिरूर ताजबंद व अहमदपूर बसस्थानक परिसरात बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी केल्याची कबुली दिली.

ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या पथकाने पोलीस निरीक्षक सुधाकर बाचकर यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, विजय पाटील , तुळशीराम बरुरे, पाराजी पुटेवाड, हरी पतंगे, चंद्रकांत केंद्रे, महिला पोलीस अंमलदार सुरेखा मदने, अंजली गायकवाड यांनी केली आहे.

## लातूर शहर मनपाची पहिली सभा मंगळवारी




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ०५ मार्च : महापालिकेच्या महापौर उपमहापौरपदांच्या निवडी होऊन तब्बल एक महिन्याने महापौरांच्या अध्यक्षतेखाली पहिली सर्वसाधारण सभा घेण्याचा मुहूर्त ठरला आहे. ही सर्वसाधारण सभा मंगळवार दि.१० मार्च रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात होणार आहे. या सभेत स्वीकृत नगरसेवकांची निवड, स्थायी समिती सदस्यांची निवड यांसह प्रभाग समित्यांच्याही निवडी करण्यात येणार आहेत. या सभेनंतरच महापालिकेच्या कामकाजाला पूर्णत्व येणार आहे. तब्बल साडेतीन वर्षांच्या प्रशासकराजनंतर आता महापालिकेत पदाधिकारी आले आहेत. पालिकेवर काँग्रेसची सत्ता आली आहे. महापौरपदी जयश्री सोनकांबळे व उपमहापौरपदी ॲड. स्नेहल उटगे यांच्या नियुक्त्या दि.९ फेब्रुवारी रोजी झाल्या आहेत. सर्व नूतन नगरसेवकांची गॅझेटमध्ये नोंद झाल्यानंतर एक महिन्यांनी सर्वसाधारण सभा घेता येते. परंतु, महापौरांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा घेण्याचा मुहूर्त ठरत नव्हता. अखेर तो मुहूर्त ठरला आहे. ही सर्वसाधारण सभा आता मंगळवारी (दि.१०) रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण सभागृहात होत आहे. या सभेत स्वीकृत नगरसेवकांच्या निवडी जाहीर करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे या सर्वसाधारण सभेत महापालिकेच्या सभागृह नेत्यासह विरोधी पक्षनेत्याची निवड करण्यात येणार आहे.

## विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे ७४ महिलांना शिलाई प्रशिक्षण

तभा वृत्तसेवा




लातूर दि.५ मार्च: जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लातूर शहरात महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने प्रभाग क्र. १७ मधील तुळजाभवानी नगर येथे राबविण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा समारोप सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमांतर्गत ७४ महिलांनी आपले प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले असून, त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांनी केवळ गृहिणी न राहता आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, हा विलासराव देशमुख फाउंडेशन'चा मुख्य उद्देश आहे. राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ट्वेंटीवन ग्री ले.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या विशेष पुढाकारातून हा उपक्रम राबवण्यात आला. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून महिलांना घरबसल्या सन्मानाने रोजगार मिळवता यावा, या विचारातून या मोफत केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे .

या प्रशिक्षण केंद्रामध्ये महिलांना केवळ प्राथमिक शिलाई न शिकवता, व्यावसायिक दृष्टिकोनातून तयार करण्यात आले. यावेळी नगरसेविका तबस्सुम शेख , विलासराव देशमुख फाउंडेशनच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे, बिराजदार, बिराजदार, प्रशिक्षक क्रांती उफाडे, बोयणे, सोमनाथ कावळे यांच्यासह भागातील प्रतिष्ठित नागरिक आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## स्वत:पासून बदलाची सुरुवात झाली तर देश परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करेल - डॉ. दंडे

तभा वृत्तसेवा

लातूर दि.५ मार्च : येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय येथील लोकप्रशासन विभागाच्या वतीने लोकप्रशासनाचा इतर सामाजिक शास्त्रांशी अंतरसंबंध या विषयावर विस्तारित व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या वेळी मंचावर अध्यक्षस्थानी स्टाफ सेक्रेटरी डॉ. संगीता घार, लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. शरण निलंगेकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले,यांची प्रमुख उपस्थती होती. प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. व्याख्यानाला विद्यार्थी व प्राध्यापक वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सदरील कार्यक्रमाच्या सुरुवातीस लातूर पॅटर्नचे जनक व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू, माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे यांचे दुःखद निधन झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते देवी अहिल्या होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील सिनेट सदस्य डॉ. वीरभद्र दंडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, समाजपरिवर्तनाची खरी सुरुवात प्रत्येक व्यक्तीने स्वत:पासून केली पाहिजे. स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवून आणला, तर त्याचा परिणाम कुटुंब, गाव, जिल्हा आणि अखेरीस देशाच्या प्रगतीत दिसून येतो, असे ते म्हणाले. प्रशासनातील मूल्याधिष्ठित दृष्टीकोन स्वीकारल्याशिवाय खरे सुशासन शक्य नाही, असेही त्यांनी नमूद केले.



डॉ. दंडे यांनी लोकप्रशासनाची संकल्पना स्पष्ट करताना सांगितले की, लोकप्रशासन हे केवळ शासकीय कामकाजाचे व्यवस्थापन नसून ते समाजव्यवस्थेच्या सर्व घटकांशी जोडलेले व्यापक शास्त्र आहे. प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व, लोकसहभाग, संवेदनशीलता आणि नैतिकता या मूल्यांचा अंगीकार केल्यास शासनव्यवस्था अधिक परिणामकारक आणि लोकाभिमुख बनते. आजच्या बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत प्रशासनाला अधिक उत्तरदायी आणि समन्वयात्मक भूमिका बजावावी लागते, असे त्यांनी प्रतिपादन केले.

लोकप्रशासनाचा इतर सामाजिक शास्त्रांशी असलेला संबंध स्पष्ट करताना त्यांनी इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र यांचा विशेष उल्लेख केला. ऐतिहासिक घडामोडींच्या आधारे प्रशासनाची रचना व स्वरूप निश्चित होत असते; अर्थशास्त्र प्रशासनाच्या धोरणांना दिशा देते; राज्यशास्त्र शासनरचनेचा पाया मजबूत करते; तर समाजशास्त्र समाजरचनेचे वास्तव चित्र प्रशासनासमोर मांडते. या सर्व शास्त्रांच्या समन्वयातून प्रशासन अधिक व्यापक, अभ्यासपूर्ण आणि परिणामकारक बनते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या स्टाफ सेक्रेटरी डॉ. संगीता घार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात लोकप्रशासनाचा संबंध साहित्य विषयांशीही जोडला जातो, असे नमूद केले. हिंदीसारख्या साहित्यविषयांमधून समाजातील विचारप्रवाह, सांस्कृतिक मूल्ये आणि लोकमानसाची जाणीव प्रशासनाला होते. साहित्य समाजाचे प्रतिबिंब असल्यामुळे प्रशासनाला लोकांच्या अपेक्षा आणि भावना समजून घेण्यासाठी साहित्याचा अभ्यास उपयुक्त ठरतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

## अग्रलेख...

# मनोबल राखणे ही देशसेवाच...

आज जगात ज्या पद्धतीने संघर्ष आणि युद्धे सुरू आहेत, त्यावरून 'शांतता' हा शब्द केवळ शब्दकोशातच उरलाय की काय, अशी शंका येते. जग अधिक सभ्य होतेय की रानटी, असा प्रश्न पडण्यासारखी ही स्थिती. लढण्याचा, आक्रमणाचा तर्क प्रत्येकाकडे तयार. पण, संयमाची वाणवा. सुरुवातीला रशिया-युक्रेन युद्ध म्हणजे आठवड्यात संपणारा खेळ वाटला होता, पण तो आता रेंगाळलेला विषय झालाय. अमेरिका, इस्रायल आणि इराण या त्रिकोणी संघर्षाने त्यात 'तेल'च ओतले आहे. इराणची तयारी पाहता हे युद्ध केवळ क्षेपणास्त्रांपुरते मर्यादित न राहता, जागतिक अर्थव्यवस्थेच्या मुळावर येणार, असे स्पष्ट संकेत दिसत आहेत. अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते खामेनेई ठार झाल्यानंतर इराणनेही ताकदीने प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. या हल्ल्यानंतर सौदी अरेबियातील सरकारी मालकीचा सर्वांत मोठा तेल शुद्धीकरण प्रकल्प तात्पुरता बंद करावा लागला. या बंदीच्या बातमीनंतर जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती ९.३२ टक्क्यांनी वाढल्या. सध्याच्या काळात जगातला प्रत्येक देश एकमेकांशी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात जोडला गेला आहे. कुठेही ठिणगी पडली की त्याची झळ कमी-जास्त प्रमाणात सर्वांना बसतेच. सध्या सुरू असलेली युद्धे त्याला अपवाद नाही. हे युद्ध पुरवठा साखळीवर घाला घालणारे आहे. तेल आणि गॅसचे भाव वाढले की, भाजीवाल्यापासून ते उद्योजकांपर्यंत सर्वांचेच बजेट कोलमडणार. भारताकडे जरी काही दिवसांचा इंधन साठा असला आणि आपण आयातीचे इतर मार्गही मोकळे ठेवले आहे असे म्हणत असलो, तरी महागाईचा राक्षस कुणालाही सोडणार नाही. अशा वेळी आमचं कसं होणार, असा टाहो फोडण्यापेक्षा, आपण आपल्या वागण्यात थोडी शिस्त, धैर्य आणि संयम आणण्याची गरज आहे. सरकार आपल्या हिताचा सर्वार्थाने विचार करते आहे. बेंबीच्या देठापासून निरर्थक प्रश्न विचारण्यापेक्षा देशहित कशात आहे, याचा विचार करणे सर्वांसाठी योग्य.

आचार्य चाणक्य म्हणतात, ज्या देशात स्वाभिमान आणि सुरक्षा संकटात असते, तिथे नागरिकांची खरी परीक्षा असते. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध इतक्यात संपेल असे वाटत नाही. ते केव्हा संपेल हेही सांगता येत नाही. पुढच्या काळात परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होऊ शकते. अशा वेळीच देशातील नागरिकांच्या धैर्य आणि संयमाची परीक्षा असते. भारतीयांना ही परीक्षा द्यावी लागणार आहे. देश जेव्हा अशा कोणत्याही संकटात असतो तेव्हा देशासोबत उभे राहणे, देशावर अनावश्यक ताण येणार नाही असे वर्तन करणे हे जबाबदार नागरिकांचे लक्षण. एखाद्या गोष्टीची टंचाई निर्माण झाली तर आरडाओरड करण्यापेक्षा संयम दाखवणे, प्रसंगी पर्यायांचा वापर करणे, नजीकच्या ठिकाणी पायी जाण्याचा प्रयत्न करणे हीसुद्धा येत्या काळात देशसेवा ठरणार आहे.

भारतीय जनतेने अशा संकटांचा सामना यापूर्वीही केलेला आहे. जेव्हा केव्हा असे संकट देशावर आले, तेव्हा जनतेने तेवढ्याच जबाबदारीने, प्राणपणाने प्रतिसाद दिला आहे. १९६५ च्या युद्धात जेव्हा अमेरिकेने भारताला गव्हाची निर्यात थांबविण्याची धमकी दिली, तेव्हा तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री अजिबात डगमगले नाहीत. त्यांनी देशाला एक वेळचे जेवण बंद करण्याचे आवाहन केले. त्याही आधी तो प्रयोग त्यांनी आपल्या स्वतःच्या घरात केला. पत्नीला- ललिता देवींना त्यांनी सांगितले की, आजपासून आपण एक वेळचे जेवण बंद करू या! त्यांच्या परिवाराने तो त्याग केला तेव्हाच त्यांनी देशाला सांगितले. पुणेकरांनी तर तेव्हा हॉटेलबाहेर फलक लावले होते- 'आज शास्त्रीजींसाठी हॉटेल बंद!' एका हाकेवर संपूर्ण देशाने पोटाला चिमटा घेतला आणि लष्कराला बळ दिले. याचा अर्थ, शास्त्रीजींनी देशाला उपाशी ठेवले असा होत नाही, तर देशाला स्वाभिमानी कसे राहायचे हे त्यांनी शिकवले. देशावरचे संकट हे आपले संकट असते, हे त्यांनी अधोरेखित केले. आज आपण इंधन वापरात संयम दाखवला तर तीही आपली 'शास्त्री-वृत्ती' ठरेल.

तत्पूर्वी, हिमालयाच्या सीमा रक्ताने माखल्या जात असताना आणि देशाच्या तिजोरीत खडखडाट असताना, मुख्यमंत्री मा. सा. कन्नमवार यांनी, सह्याद्रीच्या कड्याकपाऱ्यांतून महाराष्ट्राला साद घातली होती- 'माझ्या रक्ताच्या बांधवांनो, देश संकटात आहे. हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्रीला धावून जावे लागेल.' त्या हाकेचा असा काही चमत्कार झाला, जो या मराठी मायभूमीचा इतिहास आजही अभिमानाने सांगितला जातो. लष्कराच्या शस्त्रास्त्रांसाठी नागपूरपासून पुण्यापर्यंत आणि मुंबईपासून कोल्हापूरपर्यंतच्या नागरिकांनी त्यांच्याकडचे सोने दान करण्यासाठी रांगा लावल्या होत्या. एका सभेत एका माउलीने केवळ तिचे दागिने दिले नाहीत, तर आपले मंगळसूत्रही काढून मा. सा. कन्नमवार यांच्या हाती ठेवले होते. त्याही काळी महाराष्ट्राने तब्बल पाच कोटी रुपयांहून अधिक किमतीचे सोने आणि रोख रक्कम संरक्षण निधीसाठी दान दिले होते. अशी उदाहरणे कमी नाहीत. अलिकडच्या काळात कोविडने जेव्हा अवघ्या जगाला आपल्या विळख्यात घेतले, तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संयम आणि धैर्याचे आवाहन केले. 'लॉकडाऊन'च्या काळात घरातील पिंजऱ्यात राहूनही भारतीयांनी जो संयम दाखवला, तो पुढे जगासाठी अभ्यासाचा विषय ठरला. अखेर कोविडवर आपण सर्वांनी मात केली.

युद्ध फक्त सीमेवरच लढले जाते असे नव्हे. ते घराघरातल्या बचतीच्या पातळीवरही लढले जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर जपान पूर्णपणे उद्ध्वस्त झाला असताना तिथे इंधनाची इतकी टंचाई होती की, लोक मोठ्या प्रमाणात सायकलचा वापर करू लागले. एकाही जपानी नागरिकाने रस्त्यावर उतरून सरकारविरुद्ध आरडाओरड केली नाही. उलट प्रत्येकाने ठरवले की, मी देशासाठी दिवसाला किमान १० मिनिटे जास्त काम करेन! त्यांनी त्या पलीकडे काम केले. आजही करताहेत. परिणाम आहे आजचा विकसित जपान. अशी असते देशभक्ती. तेलाचा साठा मर्यादित असताना, तो अधिक महाग होत असताना, आपली गाडी 'सिग्नल'ला बंद करणे किंवा विनाकारण गाडी बाहेर न काढणे ही देखील देशसेवाच. केवळ मौज म्हणून 'लाँग ड्राईव्ह'वर न जाणे हेही येत्या काळात देशासाठी काहीतरी केल्याचे समाधान देणारे ठरणार आहे. शक्य तिथे पायी जाणे किंवा पर्यायी छोटे वाहन वापरणे एवढे तरी प्रत्येकाने केले पाहिजे. उद्या तेल मिळणार नाही, या अफवेने घाबरून डबेच्या डबे भरून ठेवणे ही आप्पलपोटी वृत्ती संपविली पाहिजे. आखाती देशांत युद्ध असेच सुरू राहिले, तर प्रति बॅरल १० ते २० डॉलर्सची वाढ होणे अपेक्षित आहे. पुढे ती आणखी वाढू शकेल. तेलाच्या किमतीत १० टक्के वाढ झाली की, घाऊक महागाईचा दर साधारण १ टक्क्याने वाढतो. याचा अर्थ, आपल्या ताटातील भाजी आणि डाळ महागणार आहे. तेल-मीठही महाग होऊ शकते. सध्या विशाखापट्टणम, मंगळुरू आणि पदूर येथे इंधनाचे तेल साठविण्याची सोय आहे. सुमारे ५.३३ दशलक्ष मेट्रिक टन एवढ्या कच्च्या तेलाचा आपल्याकडे साठा आहे, जो साधारण १० दिवस पुरू शकतो. या व्यतिरिक्त तेल कंपन्यांकडे ६४ दिवसांचा साठा असतो. अशाप्रकारे साधारण ७४ दिवस आपण तग धरू शकतो, असे सांगितले जात आहे. पण त्यानंतर काय, हा प्रश्न आहेच. तोवर युद्ध संपून पुरवठा साखळी सुरळीत झाली तर ठीक. अन्यथा, परिस्थिती सामान्य होईपर्यंत संयम आणि धैर्यच आपल्या कामी येणार आहे.

देशात अशी स्थिती निर्माण होते तेव्हा हक्क गाजवण्यापेक्षा कर्तव्य बजावण्यात जास्त मोठेपण असते. आरडाओरड करून भाव कमी होत नाहीत. सोशल मीडियावर कितीही पोस्टी डकवल्या तरी युद्ध लगेच थांबणार नाही. प्रत्येकाने संयम राखल्यास देशाचे मनोबल नक्कीच वाढेल. मनोबल राखणे आणि ते वाढविणे ही देखील देशसेवाच आहे!

## निमित्त

# तरुण भारत पुणे आवृत्तीचे हार्दिक स्वागत

**मोरेश्वर जोशी**

३५ वर्षांच्या अवकाशानंतर पुण्यात दैनिक 'तरुण भारत' नियमित प्रकाशित होत आहे, ही तरुण भारत प्रेमींसाठी अतिशय आनंदाची बातमी आहे. वाचकांच्या दृष्टीने ती समाधानाची बाब आहेच; पण आम्हा जुन्या कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत हर्षउल्हासाची बाब आहे. पुणे तरुण भारत मे-१९९० मध्ये बंद झाला होता. त्यात काम करणाऱ्यांची संख्याही आता हाताच्या बोटावर मोजण्याइतकी कमी राहिली आहे आणि जी आहे ती आता काम करण्याच्या वयोगटातील नाही. तरीही पण जेथे आपण घडलो आणि वाढलो, तो उपक्रम पुन्हा सुरू होत असल्यामुळे त्या काळात परत जाऊन कामाला सुरुवात करण्याच्या तयारीपर्यंत आमचे मन धावत आहे.

आम्ही पुण्यात तरुण भारतचा जो काळ पाहिला, तो प्रतिकूलतेचाच अधिक होता. तरीही प्रत्येक दिवस हा आम्हाला काही ना काही शिकवणारा होता. तेव्हाची जवळजवळ सर्व वृत्तपत्रे तशी आर्थिक स्थितीने बेताचीच. मात्र, आम्हाला पुण्यात जी परंपरा मिळाली, ती फार मोठी होती. दैनिक तरुण भारत हा संघपरिवाराशी जोडला असल्याने तेव्हापासूनच तो जीवनमूल्यांशी जोडला गेलेला होता. त्या काळी तरुण भारतवर सरकारची फारशी प्रेमाची दृष्टी नसे. आम्ही जेव्हा या कामात आलो, तेव्हा तरुण भारतमध्ये अतिशय प्रतिकूल स्थितीत झगडलेले लोक होते. बापूराव तथा चं. प. भिशीकर आरंभी संघाचे प्रचारक होते आणि त्यांचे कार्यक्षेत्र सध्याच्या पाकिस्तानातील कराची हे होते. त्यांनी फाळणीच्या वेदना प्रत्यक्ष बघितल्या होत्या. त्यांनी शाखेवर आणलेले अनेक लोक फाळणीनंतर पुण्यातही होते आणि उल्हासनगर येथे होते. माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांना संघशाखेवर त्यांनीच आणले. १९९० मध्ये अडवाणी यांनी श्रीराम जन्मभूमीच्या आंदोलनात जेव्हा सोमनाथ ते अयोध्या रथयात्रा काढली, तेव्हा ते पुण्यातून पुढे गेले. तेव्हा त्यांनी सर्किट हाऊसवरच बापूराव भिशीकर यांची भेट घेतली होती. अर्थात ती फारच छोटी भेट होती. त्या भेटीत लालजी बापूराव यांच्याशी तोडक्या-मोडक्या मराठीत बोलत होते आणि बापूरावांनी त्यांनी तोडक्या-मोडक्या सिंधीत उत्तर दिले होते. तरीही ती भेट फार हृदयस्पर्शी होती. त्यांनी एकमेकांना आलिंगन दिले तेव्हा दोघांच्या डोळ्यात अश्रू तरळले होते.

पुण्याच्या पत्रकारितेला त्यावेळी स्वातंत्र्य चळवळीत काम केलेल्या अनेक पत्रकारांची पृष्ठभूमी लाभली होती. स्वातंत्र्य चळवळीत पुण्यातील मंडळींचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असल्याने पत्रकारांमध्ये त्यात काम केलेले लोक होते. त्यामध्ये बाळासाहेब रुद्र, माधवराव साने, भि. ना. ठाकोर, प्रभातचे संपादक वा. रा. कोठारी, वि. स. माडिवाले यांचा समावेश होता. काही जणांकडे सरकारी परवानगीचे पिस्तूलही असायचे. अशा लोकांशी या ना कारणाने गप्पा मारण्याची वेळ यायची, तेव्हा अनेक घटना समोर उभ्या राहायच्या. तरुण भारतमध्ये आमच्या संपादक विभागातच बापूराव भिशीकर, वसंतराव गीत आणि विनायकराव जोशी ही वरिष्ठ मंडळी होती. प्रत्यक्ष उपसंपादक आणि बातमीदार वर्गात प्रामुख्याने माजी केंद्रीय मंत्री प्रमोद महाजन, बाळ भिडे, गो. ह. परांजपे, सुधाकर वेलणकर, गोपाळराव बुधकर ही मंडळी होती. १९७० चा तो काळ बांगलादेश निर्मितीचा होता. त्या काळी केंद्रीय राजकारणाशी संबंधित असलेले अटलबिहारी वाजपेयी व अनेक केंद्रीय पदाधिकारी पुण्यात येत. कोणतीही घटना घडली की, रामभाऊ म्हाळगी, डॉ. लेले यांच्यासह मोहन धारिया, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे यांच्या प्रतिक्रिया घेतल्या जात असत. या काळातील एक दखलपात्र घटना म्हणजे पुण्यातील 'डिफेन्स'या विषयाची आवड असलेला एक तरुण गजानन मेहेंदळे यांना तरुण भारतने बांगलादेशातील मुक्ती चळवळीच्या बातमीदारीसाठी पाठविले होते. ती बातमीदारी त्यांनी चांगली केलीच; पण नंतर त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्र लेखनाचे काम हाती घेतले. त्यानंतरच्या ५० वर्षांच्या काळात त्यांनी



**अनेक दशकांपूर्वीची आठवण... पुणे तरुण भारतच्या एका कार्यक्रमात बोलताना गोव्याचे तत्कालीन मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर, शेजारी बाळासाहेब देवरस. सोबत वसंतराव गीत, बापूराव जोशी, बाबाराव भिडे आणि अन्य मान्यवर. (वसंतराव गीत यांचे चिरंजीव डॉ. श्रीराम गीत यांच्या संग्रहातून साभार.)**

शिवचरित्र लिहून पूर्ण केले. त्याआधी ते चरित्र लिहिण्यासाठी १० मोठ्या इतिहासकारांनी प्रयत्न केला होता, पण ते प्रयत्न फळाला गेले नाहीत. मेहेंदळे यांनी सहा खंड लिहिल्यानंतरही त्यांचे असे म्हणणे होते की, मी हे चरित्र पूर्ण केले आहे. पण शिवाजी महाराजांच्या मुत्सद्देगिरीवर भाष्य करीत चरित्र लिहायचे झाले तर त्याला दोन ते तीन आयुष्ये लागतील.

वृत्तपत्रांच्या संदर्भात आमच्या आधीचा सुमारे दीडशे वर्षांचा काळ वृत्तपत्रांनी स्वातंत्र्य चळवळच हाती घेतल्याचा काळ होता. इसवीसन १८१८ मध्ये देशावर ब्रिटिशांची जुलमी सत्ता असताना बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' वृत्तपत्र काढले. त्या काळात पुण्यातील थोर मंडळी अर्थात एक एक व्यक्ती म्हणजे एक एक विद्यापीठ होते. याच काळी ब्रिटिशांनी पुण्याला देशाची राजधानी म्हणून निश्चित केले होते. पण नंतर केसरी, मराठा या दैनिकांनी साऱ्या स्वातंत्र्य चळवळींना एक निश्चित दिशा दिल्याने ब्रिटिशांनाच तो बेत आवरता घ्यावा लागला.

आमची पिढी पत्रकारितेत आली तेव्हा नुकताच पुणे विद्यापीठाने पत्रकारिता हा अभ्यासक्रम सुरू केला होता. तो पूर्ण करून आम्ही पत्रकारितेत आलो. पण त्या आधी पत्रकारितेत यायचे म्हणजे कोणातरी ज्येष्ठ पत्रकाराचा 'गंडा' बांधून कामाला आरंभ करावा लागे. वृत्तपत्रांनाही अधिक बातमीदार ठेवणे परवडत नसे. त्यामुळे महापालिका, १८ पोलिस स्टेशन्स, शिवाय राजकीय पक्षाची कार्यालये येथे जाऊन माहिती घ्यावी लागे. त्यातून पुण्यात दररोज किमान दोन तरी महत्त्वाच्या व्यक्तींच्या पत्रकार परिषदा असत. पुण्यात पानशेत होऊन नऊ वर्षे झाली होती. टेल्को, गरवारे, स्वस्तिक वैद्य, कल्याणी यांची बस्ताने बसून झाली होती. आम्ही सुरुवात करायच्या काळात कामगार चळवळी सुरू झाल्या होत्या. पानशेतनंतर सरकारने वेगाने चालना देऊन चार एमआयडीसी काढल्या होत्या. पण नंतरच्या कामगार चळवळीत त्यातील निम्म्या बंद झाल्या होत्या. दररोजच्या बातमीदारीत त्याचा मोठा सहभाग असे.

तरुण भारतमध्ये काम करतानाचा सर्वात अडचणीचा आणि भीतीचा काळ म्हणजे आणिबाणीचा काळ होय. प्रत्यक्षात मला कसलाही त्रास झाला नाही आणि पगारही कधी कमी दिला गेला असे झाले नाही. पण भीतीचे वातावरण असायचेच. पहिलाच दिवस म्हणजे २५ जून रोजी संध्याकाळी ही घोषणा झाली. आणिबाणी म्हणजे नेमके काय, हेही आम्हाला समजले नव्हते. पण तोपर्यंत देशातील मोठ्या लोकांना अटक झाल्याची बातमी आली होती. त्यावेळची एक गोष्ट निश्चित आठवते. ती म्हणजे त्यावेळी पुण्याचे महापौर भाई वैद्य आणि भारतीय जनसंघाच्या दोन-तीन व्यक्तींनी शनिवारवाड्यासमोर आणिबाणी विरोधात सत्याग्रह केला होता. त्यांना अटकही करण्यात आली. वास्तविक आंदोलनातील अटक हा आम्हा पत्रकारांना नव्याने काही पाहण्याचा विषय नव्हता. पण त्या दिवशी वातावरणात दहशत होती. पाठोपाठ रामभाऊ म्हाळगी, डॉ. अरविंद लेले. एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे तेथे येऊन पोहोचले. पण आत्ता तुम्हाला अटक करत नाही आहोत, असे पोलिसांनी सांगितले. पण, त्यांनी हेही सांगितले की, तुमचे क्रमांक पुढच्या आठवड्यात असू शकतात.

शहरातील साऱ्या बिटस्ना भेट दिल्यावर आम्ही शनिवारवाड्यावर थोडे अधिक रेंगाळलो होतो. तोपर्यंत कोणीतरी कानात येथून सांगितले की, तरुण भारतच्या कार्यालयाला पोलिसांचा वेढा पडला आहे. एवढी बातमी आल्यावर तेथे जाणे तर होतेच. अर्थात तेथे वेढा वगैरे काही नव्हता. पण ड्रेसमधील काही पोलिस आणि खाजगी वेशातील १०-१२ पोलिस कार्यालयातच आले होते. बराच वेळ कोणालाच काही कळत नव्हते. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, अंकातील प्रत्येक मजकूर आम्ही तपासू आणि अयोग्य वाटला तर तो काढायला लावू. आम्ही सारे अस्वस्थ झालो होतो. पण बापूराव अतिशय शांत होते. त्यांनी प्रसिद्धीपूर्व तपासणीस विरोध दर्शविला. तोपर्यंत सारे संचालक मंडळही आले होते. संचालक मंडळ, पोलिस अधिकारी आणि संपादक हे संचालक मंडळाच्या हॉलमध्ये गेले. तेथे १० मिनिटे चर्चा झाली. सारे पोलिस अधिकारी दररोजच्या परिचयाचेच होते. पण त्यांची भाषा काहीशी पोलिसी खाक्याची होती. त्यांनी एकच सांगितले की, तुमचा जो अंक तयार झाला आहे, त्यातील आम्हाला अमान्य असलेला मजकूर आम्ही काढून टाकू. पण हे तुम्ही करणार नसाल सर्वांना ताब्यात घेऊ. तुम्हाला प्रकाशन थांबबावे लागेल. एकूण परिस्थितीचा विचार करता, तयार अंक त्यांना द्यावा लागला. त्यांनी जवळजवळ निम्म्या बातम्या, संपादकीय काढून टाकले गेले. फक्त 'राष्ट्रीय आणिबाणी' एवढा मथळा शिल्लक ठेवला. दुसऱ्या दिवशी बाजारात जो अंक गेला, तो निम्मा अंक खोडलेला होता.

दुसऱ्या दिवशीपासून प्रत्येक बातमी पोलिसांना द्यावी लागत असे. त्या दिवशीपासून शहरातही दररोज आणिबाणीविरोधात निदर्शने होत होती. अटकसत्रही सुरू होते. देशभरातील आणिबाणीची दहशत व वृत्तांतही सर्वांना परिचित आहे. पण तरुण भारतमध्ये हळूहळू अटकसत्र व वेळी-अवेळी तपासण्या सुरू झाल्या. विनायकराव जोशी आणि सारोळकर या दोन वरिष्ठांना अटक झाली. तरुण भारतच्या साप्ताहिक बैठकीत संपादक बापूराव भिशीकर यांनी अतिशय संयमित भाषेत सांगितले की, एक दैनिक सुरू करायला एक पिढी लागते. त्यामुळे आपल्याला तरुण भारत बंद करायचा नाही. अतिशय शांतपणे सर्वांनी काम करावे. त्या प्रसंगाने संपादक बापूराव भिशीकर यांच्या स्वभावाचा एक धीरोदात्त पैलू कळला.

आता त्याच तरुण भारतची पुणे आवृत्ती पुन्हा सुरू होत आहे. आता तसे नव्या वृत्तपत्राचे फारसे अप्रूप राहिलेले नाही, पण राष्ट्रीय भूमिका मांडण्याची गरज असतेच. गेल्या १२ वर्षांत अगदी मोदी यांचे सरकार आल्यावरही आपण दहशतवादाचे नवे रूप सतत पाहतो आणि जिहादी-अत्याचाराच्या दररोज नव्या घटना पुढे येत असतात. लव्ह जिहाद, थुंकी जिहाद, गोध्रा जिहादाची तयारी तर प्रत्येक गावी केली गेलेली असल्याचे चित्र आहे. अशा घटना २०१४ पूर्वी अधिक प्रमाणात घडत, पण त्यांच्या बातम्या येत नसत. आता त्या येताहेत आणि त्यांच्या विरोधात जनमत तयार होते आहे. अर्थात, या साऱ्यांचा सामना कसा करायचा, हे बापूराव भिशीकरांनी ज्या सौम्य व ठाम भाषेत सांगितले होते, त्याच पद्धतीने तरुण भारतला पुढे जावे लागणार आहे.

पुण्यात नागपूर तरुण भारतची पुणे आवृत्ती निघत आहे आणि पुण्यातच मुद्रित होऊन वितरित होत आहे, याचे मनापासून स्वागत आहे. .

पुणे

## वाचक पत्रे

### तुका आकाशा एव्हढा



संत तुकारामांच्या अभंगवाणीने अवघ्या महाराष्ट्राला सुसंस्कारित करण्याचे कार्य केले. समाजमनावर संस्काराचा फार खोल परिणाम त्यांच्या अभंग रचनेने केला आहे. त्यांच्या प्रत्येक अभंगातून जीवनमूल्यांचा संदेश दिलेला आहे. आजच्या यंत्रयुगामध्ये परोपकाराची जागा उपद्रवी वृत्तीने घेतलेली आहे. या सर्व उपद्रवी वृत्तींना संत तुकारामांनी साडेचारशे वर्षांपूर्वी प्रखर विरोध करून जीवनोपयोगी तत्त्वज्ञान मांडले आहे. पुण्य परउपकार पाप ते परपीडा ।

आणीक नाहीं जोडा दुजा यासी ॥१॥
सत्य तो चि धर्म असत्य ते कर्म ।
आणीक हे वर्म नाहीं दुजे ॥धृ.॥

असा सोपा तत्त्वज्ञानाचा जीवनमूल्यविचार आपल्या अभंगातून सांगितला. तुकोबा सर्वांना जवळचे वाटतात. ते खरे लोकशिक्षक ठरले आहेत. त्यांनी सांगितलेली जीवनमूल्ये ही जीवनाला 'स्वाभिमानी' व 'तेजस्वी' करणारी आहेत. त्याद्वारे कुणालाही आपल्या आयुष्याच्या कालमर्यादित समाधानाच्या अत्युच्च शिखरावर पोहोचता येते. संत तुकारामांनी आपल्या अभंग वाङ्मयातून सात्त्विकतेचा समाधानी भाव निर्माण केला. त्यामुळेच त्यांचे अभंग अक्षरवाङ्मय ठरले. सोबतच ते भागवत संप्रदायातील वैचारिक धर्ममंदिराचे कळस ठरले आहेत.

**डॉ. हरिदास आखरे** / ७५८८५६६४००

### अमेरिकेला विरोध करावा

अमेरिकेने युद्ध कितीही चालू ठेवू शकतो सांगून त्यांचा दंभ जगाला दाखवून दिला असला, तरी तिसऱ्या महायुद्धाची नांदी घालणे त्यांना अशोभनीय आहे. आत्तापर्यंत शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी तारांगण घालणारे ट्रम्प इराणवर हल्ला करून खामेनेईचा खात्मा करतात, ही दुसऱ्या देशात ढवळाढवळ करण्याची परिसीमा आहे. त्यात पुन्हा इस्रायलने त्यांना साथ दिली याचेही दुःख आहेच. अर्थात खामेनी हे धुतल्या तांदळासारखे कधीच नव्हते हे इराणमधील महिला नक्की सांगतील; तरीही एखाद्या देशात राजवट उलथायचा निर्णय हा तिथल्या नागरिकांचा असला पाहिजे, महासत्तेच्या नव्हे! त्याही पलीकडे जाऊन ट्रम्पना लागलेली नैसर्गिक तेलाची पिपासा हा जगासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. संपूर्ण जग आपल्या तालावर नाचावं ही अपेक्षाच अस्थानी असून संपूर्ण जगात उलथापालथ करण्याचा अमेरिकेला काडीमात्र अधिकार नाही. याआधीही सद्दाम हुसेन, ओसामा बिन लादेन, व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांचे अपहरण ही निव्वळ पुंडशाही असून त्याला खीळ घालण्याची गरज आहे. जगातील सर्व देशांनी निर्भयपणे अमेरिकेला विरोध केला पाहिजे आणि वेळ आलीच तर वाळीतही टाकायला पाहिजे.

**माया हेमंत भाटकर**/ पुणे-९८६९०७४४९९

### युवकांसाठी मार्गदर्शन

आजच्या स्पर्धात्मक युगात युवकांना करिअर, उद्योजकता आणि स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शनाची गरज आहे. तरुण भारतने राष्ट्रभावनेसोबतच युवकांच्या प्रगतीसाठी साप्ताहिक विशेष पुरवणी सुरू करावी. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा फायदा होईल.

**साक्षी पाटील** /पुणे

### ग्रामीण प्रश्नांवर अधिक भर द्यावा

तरुण भारतमधील राजकीय विश्लेषण प्रभावी असते; मात्र ग्रामीण भागातील शेतकरी, पाणीटंचाई, शेतीमालाचे दर यांसारख्या प्रश्नांवर अधिक सखोल लेख येणे आवश्यक आहे. ग्रामीण भारत हा देशाचा कणा आहे. त्यांचे प्रश्न ठळकपणे मांडले जावे, ही नम्र विनंती.

**संकेत बोरावके** /पुणे

### सामाजिक एकात्मतेबाबत...

दैनिक तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणारे सामाजिक एकात्मता आणि राष्ट्रभक्तीवरील लेख वाचून समाधान वाटते. आजच्या विभाजित राजकारणाच्या वातावरणात समाजाला एकत्र ठेवण्याची गरज आहे. आपल्या वृत्तपत्रातून भारती संस्कृती, परंपरा आणि राष्ट्रीय मूल्ये यांचा सातत्याने प्रचार होत असल्याने तरुण पिढीला योग्य दिशा मिळत आहे. अशाच प्रकारचे वैचारिक लेख अधिक प्रमाणात प्रसिद्ध व्हावेत, ही अपेक्षा.

**विश्वास कुलकर्णी** / पुणे

### तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी

सध्या इराण युद्धात इस्रायल व अमेरिका क्षेपणास्त्राच्या हल्ल्यात दोन्हीही बाजूने जीवित-वित्त हानी होत आहे. भारतातील चाकरमाने सौदी अरेबिया, कुवैत आदी अडकून पडले आहेत. पश्चिम आशिया खंडातील स्थिती चिंताजनक आहे. अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाने यात वेगाने मुसंडी मारली आहे. जगातील इतर खंडातील ब्रिटन, फ्रान्स, जर्मनीसारखे प्रगत देश युद्धात उडी घेण्याच्या तयारीत आहेत. युद्धाचे स्वरूप आता भीषण झाले आहे. भारतातील शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या निर्यातीला फटका बसला आहे. भाववाढ होत आहे. पर्यटक भारतीय प्रवासी हवालदिल झाले आहेत. ही तिसऱ्या जागतिक महायुद्धाची ही ठिणगी आहे, असे वाटू लागले आहे.

**ॲड. बळवंत रानडे** / ९८८१४७३५८०

## दिल्ली वार्तापत्र

# मुख्यमंत्रिपद गेल्यानंतर पक्षांतर करणारे नेते

**श्यामकांत जहागीरदार**

**एखाद्या पक्षाच्या माजी मुख्यमंत्र्याने पद गेल्यानंतर राजीनामा देत दुसऱ्या पक्षात जाण्याची देशातील ही पहिलीच घटना नाही. आतापर्यंत देशातील जवळपास दोन डझनांवर माजी मुख्यमंत्र्यांनी पद गमावल्यानंतर आपल्या पक्षाचा राजीनामा देत दुसऱ्या पक्षात प्रवेश केला वा आपला नवा पक्ष स्थापन केला.**

तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुकीकडे राज्यातीलच नाही तर देशातील जनतेचेही लक्ष लागले आहे. राज्यात द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन प्रादेशिक पक्षातच खरी चुरस असते. काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना एकतर द्रमुक वा अण्णाद्रमुकच्या मदतीने निवडणूक रिंगणात उतरावे लागते. काँग्रेस द्रमुकसोबत गेली तर भाजपाला अण्णाद्रमुकचा हात पकडावा लागतो. राज्यातील सत्ता द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन पक्षातच आलटून पालटून फिरत असते. यावेळी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि अण्णाद्रमुकचे ज्येष्ठ नेते ओ. पनीरसेल्वम यांनी द्रमुकचे नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री स्टॉलिन यांच्या उपस्थितीत द्रमुकमध्ये प्रवेश केला. यामुळे अण्णाद्रमुकला धक्का बसला, असे म्हणता येणार नसले, तरी राज्याच्या राजकारणात मात्र खळबळ उडाली. अण्णाद्रमुकच्या सर्वेसर्वा जयललिता यांच्या निधनानंतर अण्णाद्रमुकमध्ये फूट पडली, या पक्षाची शकले झाली. पनीरसेल्वम राज्यात ओपीएस म्हणून ओळखले जातात. पनीरसेल्वम यांनी तीनदा राज्याचे मुख्यमंत्रिपद भूषविले आहे. जयललिता यांचे अतिशय विश्वासू म्हणून ते ओळखले जात होते. पण जयललिता यांच्या निधनानंतर अण्णाद्रमुकमध्ये नेतृत्वाचा संघर्ष सुरू झाला. पनीरसेल्वम, पलानीसामी आणि शशिकला असे तीन गट अण्णाद्रमुकमध्ये पडले. पनीरसेल्वम २००१ मध्ये पहिल्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले; मात्र सहा महिन्यातच त्यांना राजीनामा द्यावा लागला. २०१४ मध्ये पनीरसेल्वम दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. यावेळी एक महिन्यातच त्यांचे मुख्यमंत्रिपद गेले. २०१६ मध्ये पनीरसेल्वम तिसऱ्यांदा तामिळनाडूचे मुख्यमंत्री झाले. वर्षभरापेक्षा कमी कालावधीतच त्यांना राजीनामा द्यावा लागला.

एखाद्या पक्षाच्या माजी मुख्यमंत्र्याने पद गेल्यानंतर राजीनामा देत दुसऱ्या पक्षात जाण्याची देशातील ही पहिलीच घटना नाही. आतापर्यंत देशातील जवळपास दोन डझनांवर माजी मुख्यमंत्र्यांनी पद गमावल्यानंतर आपल्या पक्षाचा राजीनामा देत दुसऱ्या पक्षात प्रवेश केला वा आपला नवा पक्ष स्थापन केला. मात्र यातील एक अपवाद वगळता दुसऱ्या कोणालाच मुख्यमंत्री बनता आले नाही. अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू हे देशातील एकमेव असे मुख्यमंत्री होते, ज्यांना दुसऱ्या पक्षात गेल्यानंतरही मुख्यमंत्रिपदाची शपथ घेता आली. पेमा खांडू काँग्रेसचे नेते होते. सप्टेंबर २०१६ मध्ये त्यांनी काँग्रेस सोडत अरुणाचल पीपल्स पार्टी या पक्षाची स्थापना केली. नंतर तीन-चार महिन्यातच आपला पक्ष त्यांनी भाजपात विलीन करून टाकला. या दोन्ही परिस्थितीत मुख्यमंत्रिपद त्यांच्याकडे कायम राहिले. अन्य माजी मुख्यमंत्र्यांना मात्र केंद्रीय मंत्री, खासदार आणि पक्षप्रमुख या पदांवरच समाधान मानावे लागले. मुख्यमंत्रिपद गमवावे लागल्यानंतर दुसऱ्या पक्षात प्रवेश केलेले सर्वाधिक म्हणजे चार माजी मुख्यमंत्री हे गोव्यातील आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तराखंडातील प्रत्येकी दोन माजी मुख्यमंत्र्याचाही यात समावेश आहे. महाराष्ट्रात अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या शासनकाळात मुख्यमंत्रिपद भूषविले होते. नंतर चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केला. आता ते भाजपातर्फे राज्यसभेवर आहे. नारायण राणे यांनी शिवसेनेचे नेते म्हणून मुख्यमंत्रिपद भूषवले. नंतर राणे यांनी आधी काँग्रेसमध्ये आणि नंतर भाजपात प्रवेश केला. भाजपात आल्यानंतर राणे यांना केंद्रीय मंत्रिपद भूषविण्याची संधीही मिळाली. राजकीय आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजे २०१७ मध्ये वयाच्या ८५ व्या वर्षी काँग्रेस नेते एस. एम. कृष्णा यांनी काँग्रेस सोडत भाजपामध्ये प्रवेश केला. कृष्णा १९९९ ते २००४ या काळात कर्नाटकचे मुख्यमंत्री होते. ज्येष्ठ काँग्रेस नेते नारायणदत्त तिवारी यांनी उत्तरप्रदेश आणि उत्तराखंड अशा दोन राज्यांचे मुख्यमंत्रिपद भूषविले होते. तिवारी यांनी काँग्रेस सोडत नव्या पक्षाची स्थापना केली होती. विजय बहुगुणा यांनी काँग्रेस नेते म्हणून उत्तराखंडचे मुख्यमंत्रिपद भूषविले होते. पण २०१६ मध्ये त्यांनी काँग्रेस सोडत भाजपात प्रवेश केला.जितनराम मांझी जदयुचे ज्येष्ठ नेते होते. नितीशकुमार यांच्या जागेवर त्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. पण वर्षभरापेक्षा कमी कालावधीत त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. मांझी यांनी मुख्यमंत्रिपदासोबत जदयुचाही राजीनामा देत हिंदुस्थान अवाम मोर्चा या आपल्या पक्षाची स्थापना केली. आज हा पक्ष रालोआचा घटक पक्ष आहे आणि मांझी केंद्रात मंत्री आहेत.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद २००५ ते २००८ या काळात जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री होते. पक्षनेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आझाद यांनी काँग्रेसचा राजीनामा देत डेमोक्रेटिक आझाद पक्षाची स्थापना केली. कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी दोनदा पंजाबचे मुख्यमंत्रिपद भूषविले. मात्र नेतृत्वाशी मतभेद झाल्यानंतर अमरिंदरसिंग यांनी काँग्रेसचा राजीनामा देत पंजाब लोक काँग्रेस या आपल्या पक्षाची स्थापना केली. विधानसभा निवडणुकीत या पक्षाचे पानिपत झाल्यानंतर अमरिंदरसिंग यांनी आपला पक्ष भाजपात विलीन करून टाकला.

गोव्याचे माजी मुख्यमंत्री असलेले दिगंबर कामत यांनी २०२२ मध्ये काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला. राज्यातील दुसरे माजी मुख्यमंत्री लुईजिन्हो फेलेरियो यांनी काँग्रेसचा राजीनामा देत तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. रवी नाईक यांनीही काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला. चर्चिल आलेमाओ यांनी काँग्रेस सोडत तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांनी भाजपा सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. पण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी त्यांची भाजपात घरवापसी झाली. झारखंडचे माजी मुख्यमंत्री बाबुलाल मरांडी यांनी छत्तीसगडमध्ये भाजपा सोडत झारखंड विकास मोर्चा या आपल्या पक्षाची स्थापना केली; २०२० मध्ये ते पुन्हा भाजपात परतले. चंपाई सोरेन फेब्रुवारी ते जुलै २०२४ या काळात झामुमोचे नेते म्हणून मुख्यमंत्री होते. पण मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर सोरेन यांनी भाजपात प्रवेश केला.

मेघालयचे मुख्यमंत्रिपद दोनदा भूषविणारे मुकुल संगमा यांनी २०२१ मध्ये काँग्रेस सोडत तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ओडिशाचे माजी मुख्यमंत्री गिरधर गमांग यांनी २०१५ मध्ये काँग्रेस सोडत आधी भाजपात आणि नंतर भाजपातून तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री किरणकुमार रेड्डी यांनी आंध्रप्रदेशचे विभाजन करण्याच्या काँग्रेसच्या निर्णयाच्या निषेधार्थ २०२३ मध्ये भाजपात प्रवेश केला होता. छत्तीसगडचे पहिले मुख्यमंत्री अजित जोगी यांनी २०१७ मध्ये काँग्रेस सोडत जनता छत्तीसगड काँग्रेसची स्थापना केली होती. या मालिकेत आता अण्णाद्रमुकचे ज्येष्ठ नेते ओ. पनीरसेल्वम यांनी अण्णाद्रमुक सोडत द्रमुकमध्ये प्रवेश केला. पक्षविरोधी कारवाया केल्याच्या आरोपात त्यांना पलानीसामी गटाने अण्णाद्रमुकमधून निष्कासित केले होते. नवा पक्ष स्थापन करण्याचा आणि स्टॅलिन यांच्या नेतृत्वातील द्रमुकमध्ये प्रवेश करण्याचा असे दोन पर्याय होते. द्रमुकमध्ये प्रवेश केल्यानंतर पनीरसेल्वम यांनी राज्यात अण्णाद्रमुक कधीच सत्तेवर येऊ शकणार नाही, असा शापही दिला आहे. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत राज्यात द्रमुक आपली सत्ता कायम ठेवणार की अण्णाद्रमुक सत्तेवर येणार, याकडे आता सगळ्यांचे लक्ष राहणार आहे.

९९९९६६७८१७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पुरातत्त्व विभागाने श्री खंडोबा दीपमाळ या ऐतिहासिक पर्यटनस्थळी उभारला टी पॉइंट

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** बीड शहरात पर्यटन करण्याजोगी अनेक ठिकाणे आहेत. यात पुरातन खंडोबा दीपमाळ मंदिराचाही समावेश आहे. मात्र, अशा ठिकाणांच्या आसपास पर्यटकांना कुठल्याही सुविधा नव्हत्या. मात्र, पुरातत्त्व विभागाने श्री खंडोबा दीपमाळ या ऐतिहासिक पर्यटनस्थळी टी पॉइंट उभारला असून, लवकरच याची सुरवात होणार आहे. पर्यटकांना चहा, नाश्त्यासह कपडे बदलणे, फ्रेश होण्याचीही व्यवस्था या ठिकाणी असेल.

श्री खंडोबा दीपमाळ मंदिर हे जिल्ह्यातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक वधार्मिक पर्यटनस्थळ असून, येथे भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी येतात. अलीकडच्या काळात पर्यटकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत आहे. आता या दीपमाळींची दुरुस्ती करण्यात येत असून, परराज्यातील कलाकारांकडून झळाळी देण्याचे काम सुरू आहे. आता या ठिकाणी उभारलेले टी पॉइंटही लवकरच सुरू होणार असल्याने पर्यटकांना किमान सुविधा भेटणार आहेत.

दरम्यान, खंडोबा दीपमाळ मंदिर शहराच्या बाजूला असल्याने आजूबाजूला वर्दळ नाही. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या ठिकाणी व्यवस्थेची गरज आहे.

# जिल्ह्यातील चुकीचे फार्मर आयडी दुरुस्तीसाठी पर्याय उपलब्ध करा.!

## शंकर देशमुख यांची मुख्यमंत्री व पंकजाताईंकडे मागणी..!

**तभा. वृत्तसेवा**

**बीड प्रतिनिधी |** शासनाकडून शेतकऱ्यांना विविध योजनेचा पारदर्शक लाभ देण्यासाठी फार्मर आयडी ही संकल्पन राज्यभर राबवून, बंधनकारक करण्यात आली आहे.

परंतु बीड जिल्ह्यात शासनाकडून पथदर्शी प्रकल्पा अंतर्गत काढलेले फार्मर आयडीमध्ये जमिनीचे वाढीव क्षेत्र जोडल्यामुळे शेतकरी पोखरासह विविध योजनेने लाभापासून पासून वंचित राहत आहेत.



जिल्हामध्ये फार्मर आयडी योजना राबवताना शेतकऱ्यांची जमीन धारणा तलाठी यांनी केली होती. जमीन धारणा करताना प्रत्येक गटामध्ये १ हेक्टर ९९ आर एवढे अवास्तव जमीन दाखवण्यात आलेली आहे. ८ अ पेक्षा जास्त जमीन जोडल्यामुळे लाभ घेताना अडचणी निर्माण होत आहे.

शासन स्तरावरून तलाठी मार्फत ( फार्मर आयडीला ) दुरुस्ती देण्यात आली. परंतु क्षेत्र कमी करण्यासाठी अद्याप पर्यंत कुठलाही पर्याय उपलब्ध नाही.

या अनुषंगाने भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी परळी येथील पशुधन महा एक्स्पो मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून व पत्राद्वारे फॉर्मवर आयडी दुरुस्तीची मागणी केली आहे.

दुरुस्तीमुळे फॉर्मर आयडीमधील वाढीव क्षेत्र कमी होऊन, शेतकऱ्यांना पीक विमा, पोखरा, महाडीबीटी सारख्या योजना राबवताना अडचणीचा सामना करावा लागणार नाही.

# कांदा उत्पादकांना फटका; दरात घसरण, शेतकरी हवालदिल

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** जिल्ह्यातील तेलघना येथील कांदा उत्पादक शेतकरी सध्या इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे मोठ्या संकटात सापडले आहेत. आखाती देशांतील या संघर्षामुळे कांद्याची निर्यात पूर्णपणे विस्कळीत झाली असून, त्याचा थेट परिणाम स्थानिक बाजारपेठेतील दरांवर झाला आहे. दरवर्षी २५ ते ३० रुपये मिळणारा भाव यंदा कोसळल्याने, आपला माल हैदराबादला विक्रीसाठी नेणाऱ्या शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे. आधीच अवकाळी पावसाने पिकाचे नुकसान केलेले असताना, आता युद्धाच्या जागतिक संकटामुळे शेतकऱ्यांचे अश्रू अनावर झाले आहेत. बँक आणि सावकारांचे कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत असलेल्या बळीराजाने आता सरकारने कांद्याला किमान ३० रुपये हमीभाव देण्याची आर्त साद घातली आहे. वेळीच सरकारी मदत न मिळाल्यास अनेक शेतकरी कुटुंबे उद्ध्वस्त होण्याची भीती निर्माण झाली असून, प्रशासनाने या गंभीर परिस्थितीकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.



# बर्दापूर हद्दीत धाडसी कारवाई; १० लाखांच्या गांजासह आरोपी अटकेत

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** अंबाजोगाई उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या पथकाने मोठी कारवाई करत बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ३३ किलो ८०० ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या मुद्देमालाची अंदाजे किंमत १० लाख ८०० रुपये इतकी आहे. गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे पोलिसांनी मूर्ती फाट्याजवळ सापळा रचून मुद्देमालासह रंगेहाथ ताब्यात घेतले, तर उर्वरीत दोघे फरार झाले.

घटनास्थळी फॉरेन्सिक लॅबच्या पथकाने पंचनामा केला असून बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे आणि त्यांच्या विशेष पथकाचा सहभाग होता. या धाडसी कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून संपूर्ण अंबाजोगाई परिसरातून पोलीस दलाचे विशेष कौतुक होत आहे.

# केज येथे श्रीकृष्ण मंदिर भूमिपूजन व 108 कुंडी महा विष्णु महायज्ञाचे आयोजन

**तभा. वृत्तसेवा**

**केज |** केज शहरातील भगवान श्रीकृष्ण आश्रम,बीड रोड येथे श्रीकृष्ण मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्या निमित्त १०८ कुंडी भव्य महाविष्णु याग,तसेच ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.हा धार्मिक कार्यक्रम बुधवार दि.११ मार्च २०२६ ते गुरुवार दि.१९ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे.

या महा विष्णु यज्ञ,राम कथा व किर्तन सोहळ्या साठी हिमाचल प्रदेश येथील महंत तपस्वी परमहंस श्री १००८ स्वामी चिन्मय पुरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिति लाभणार आहे.संगीत रामकथा प्रवक्ते श्री.ह.भ. प. रामराव महाराज ढोक करणार असून दररोज सकाळी ८ ते ११ वाजता

महाविष्णु १०८ कुंडी यज्ञ दुपारी २ ते ५ संगीत तुलसी रामायण कथा,

सायंकाळी धार्मिक विधी, कीर्तन व हरि जागराचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमात विविध संत-महात्म्यांची कीर्तन सेवा लाभणार असून भाविकांसाठी दररोज महाप्रसाद व अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. परिसरातील सर्व भाविकांनी व धर्मप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पुण्यलाभाचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन भागवत भुषण श्री.ह.भ.प.केशव महाराज शास्त्री व श्रीकृष्ण आश्रम परिवार यांच्या वतीने करण्यात आले असून अधिक माहितीसाठी भाविकांनी आयोजकांशी संपर्क साधावा,असेही कळविण्यात आले आहे. दरम्यान यज्ञ मंडपाचे काम पुर्णत्वास आले असून राजस्थान येथील कारागीर मंडप उभारणी करण्यात मग्न आहेत. १०८ यज्ञ कुंड तयार करण्यात आले असून त्यांना गोमूत्र,गोमय, मृतीका यांनी सारवण करुन रंगरंगोटी करण्यात येत आहे.श्रीराम कथा मंडपाचे काम पुर्णत्वास आले असून भोजन मंडपाचे काम गतीने सुरू आहे अशी माहिती भगवान श्री कृष्ण आश्रम येथील आयोजक भागवत भुषण ह.भ.प. श्री. केशव महाराज शास्त्री यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.

# पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांवर लवकरच पदभरती – मंत्री पंकजा मुंडे

**तभा. वृत्तसेवा**

**मुंबई |** पशुसंवर्धन विभागातील नवीन आकृतीबंध ऑक्टोबर २०२४ मध्ये मंजूर झाल्यामुळे काही संवर्गांतील पदसंख्या वाढली आहे. पदभरतीची प्रक्रिया गतीने सुरू असून पुढील अधिवेशनापर्यंत मोठ्या प्रमाणात भरतीचा प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानपरिषदेत व्यक्त केला.

विधानपरिषद सदस्य संजय खोडके यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री मुंडे म्हणाल्या की, वाढीव पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) सोबत सातत्याने पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यानुसार २५ एप्रिल २०२५ रोजी एलडीओ (पशुवैद्यकीय विकास अधिकारी) पदांची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. तसेच १२ ऑगस्ट रोजी वर्ग-एक दर्जाच्या सहा सहाय्यक आयुक्तपदांची जाहिरातही काढण्यात आली आहे.

परीक्षेसाठी पेपर सेटिंग प्रक्रियेसाठी तज्ज्ञ अधिकारी व प्राध्यापकांची नियुक्ती आवश्यक असून पेपर सेटिंगचे काम पूर्ण होताच परीक्षा घेण्यात येईल, असेही मंत्री मुंडे यांनी सांगितले. त्याचबरोबर, एमपीएससीकडूनही भरती प्रक्रियेला गती देण्याचे आश्वासन देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

पशुपर्यवेक्षकांची पदे जिल्हा परिषदेमार्फत भरण्यात येणार असून त्याबाबत सामान्य प्रशासन विभागाशी चर्चा झाली आहे. नवीन आकृतीबंधानुसार वाढलेल्या पदांची भरती अपरिहार्य आहे. त्यानुसार सर्व प्रक्रिया सुरू असून पुढील अधिवेशनापर्यंत मोठ्या प्रमाणात पदभरती पूर्ण होईल, असे मंत्री मुंडे यांनी सांगितले.

# इंधन टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नका; जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** बीड जिल्ह्यात आखाती देशांमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन टंचाई निर्माण झाल्याच्या अफवा पसरत असल्याने पेट्रोल पंपांवर नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे. मात्र, जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

सध्या आखाती देशांतील तणावामुळे इंधन टंचाई होईल या भीतीने अनेक ठिकाणी नागरिक वाहनांमध्ये अतिरिक्त इंधन साठवण्यासाठी गर्दी करत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचा तुटवडा नाही. सर्व पेट्रोल पंप कंपन्यांच्या प्रतिनिधींना पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता अफवांकडे दुर्लक्ष करावे आणि पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी. चुकीची माहिती किंवा अफवा पसरवणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. जनतेने संयम राखून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

# परळीतील भाजप नेते, पत्रकार किरण धोंड यांच्या सुविद्य पत्नी सौ.कीर्ती धोंड यांचे निधन

**तभा. वृत्तसेवा**

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) |** येथील भारतीय जनता पार्टीचे नेते तथा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद शहराध्यक्ष किरण धोंड यांच्या सुविद्य पत्नी सौ. कीर्ती किरण धोंड (वय ४२) यांचे आज, गुरुवार दि. ५ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या जाण्याने धोंड परिवारासह स्नेही, आप्तेष्ट, मित्र परिवारावर शोककळा पसरली आहे.

सौ. कीर्ती किरण धोंड यांनी अंगणवाडी शिक्षिका म्हणून परळीत काम केले. विविध सामाजिक उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला. अत्यंत मनमिळावू, कुटुंबवत्सल आणि कार्यतत्पर व्यक्तिमत्व म्हणून त्या सर्वपरिचित होत्या.सौ. कीर्ती धोंड यांनी अंगणवाडी शिक्षिका म्हणून सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या पश्चात पती, सासू आणि एक मुलगा असा परिवार आहे.



स्वतः च्या आजारपणातही जपले होते सामाजिक भान

सौ. कीर्ती धोंड या केवळ अंगणवाडी शिक्षिका म्हणून कार्यरत नव्हत्या, तर त्यांनी समाजासमोर एक वेगळा आदर्श ठेवला होता. २०२३ मध्ये त्यांनी शासकीय कर्करोग रुग्णालयातील राबवलेल्या उपक्रमाची आठवण प्रकर्षाने होत आहे.सामान्यतः अधिक महिन्यात लेक-जावयांना घरी बोलावून 'धोंडे जेवण' देण्याची प्रथा असताना, त्यांनी या प्रथेला एक विधायक वळण दिले होते. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील शासकीय कर्करोग रुग्णालयातील रुग्णांना त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन धोंडे जेवण दिले होते. एवढेच नाही तर नातेवाईकां प्रमाणेच रुग्णांना 'आहेर' भेट देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला होता. स्वतः वर उपचार सुरू असतानाही त्यांच्या या सामाजिक भानाच्या या उपक्रमाचे वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. गायकवाड व कर्मचाऱ्यांनी मोठे कौतुक केले होते.

# हिंदीच्या पेपरला ९३५ विद्यार्थी गैरहजर

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** दहावीच्या हिंदी विषयाच्या परीक्षेला ९३५ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षा केंद्रांच्या वर्गखोल्या झूमद्वारे जोडल्याने कॉपीच्या प्रकारावर पूर्णपणे आळा बसल्याचा दावा शिक्षण विभागाने केला. गेवराई तालुक्यातील जातेगावच्या केंद्रावर कॉपी व पेपर फुटल्याचा आरोपही अफवा असल्याचे पत्रकात म्हटले आहे.

३५ हजार २७४ विद्यार्थ्यांनी हिंदी विषयाची परीक्षा दिली. जिल्ह्यातील ६५३ शाळांमधील विद्यार्थ्यांची परीक्षा जिल्ह्यातील १५६ केंद्रांवर होत आहे. बारावीच्या धर्तीवर दहावी परीक्षेसाठीही शिक्षणविभागाने सर्व केंद्रांवर झूम ॲपद्वारे नियंत्रणाचा प्रयोग केला आहे. बुधवारी हिंदीच्या पेपरला १५६ केंद्रांतील १५०० वर्गखोल्या झूमद्वारे जोडल्याची माहिती शिक्षणाधिकारी (मा.) प्रियाराणी पाटील यांनी दिली. या झूमचा ॲक्सेस बीडच्या नियंत्रण कक्षाला जोडून पथकाद्वारे निगराणी ठेवली जात होती. सिरसदेवी (ता. गेवराई) येथील केंद्रात विद्यार्थ्यांना पत्र्याच्या खोलीत बसविले व जातेगाव येथील केंद्रात कॉपी पुरविल्याबाबत चौकशी सुरू असून, पेपर फुटल्याबाबत खातरजमा केली असता, हा तथ्यहीन आरोप आढळल्याचा दावा शिक्षण विभागाने पत्रकाद्वारे केला.

# गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त आरोग्य सप्ताहाचे आयोजन

## गुरुपुत्र युवासंत चंद्रकांत मोरे यांची प्रमुख उपस्थिती, १० मार्च रोजी मोफत आरोग्य तपासणी व ऑपरेशन शिबीर

**तभा. वृत्तसेवा**

**माजलगाव |** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त दि. ५ ते १२ मार्च २०२६ दरम्यान आरोग्य सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या आरोग्य सप्ताहामध्ये मोफत आरोग्य तपासणी, नाडी परीक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

मोफत आरोग्यसेवा देण्यासाठी सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर येथील डॉ शेवाळे, डॉ जयेश पाटील उपस्थित राहणार आहेत. दि. १० मार्च रोजी परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड कॅन्सर रिसर्च सेंटर माली पारगाव येथे होणाऱ्या महा आरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी गुरुपुत्र युवासंत आदरणीय चंद्रकांत (दादासाहेब) मोरे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी महा सत्संग आरोग्य मेळाव्यातून चंद्रकांत मोरे यांचे अमृततुल्य हितगुज, आरोग्य, अध्यात्मिक, सामाजिक, धार्मिक इत्यादी विषयांव अनमोल मार्गदर्शन लाभणार आहे.

यानंतर याठिकाणी कॅन्सर, हार्निया, गर्भाशयाचे आजार, पित्ताशयाचे, हायड्रोसील, अपेंडिक्स, ॲन्जियोप्लास्टी, हाडांच्या शस्त्रक्रिया, सांधे विकार, पंचकर्म, फिजिओथेरपी, वात, कफ, पित्त, अर्धांगवायू, मनक्याचे विकार, कान, नाक व घसा, मधुमेह, रक्तदाब, यासह सर्व आजारांची तपासणी केली जाणार असून, आयुष्मान भारत या योजनेत पात्र असणारे रुग्णांचे मोफत ऑपरेशन करून दिले जाणार आहेत.व पात्र नसलेल्या परंतु शस्त्रक्रियेची आवश्यकता असणाऱ्या रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करून दिली जाईल मेडिकलचा व लॅबचा खर्च वैयक्तिक करावा. माजलगाव तालुक्यातील सर्व ठिकाणी होणाऱ्या मोफत आरोग्य तपासणी शिबीरांचा बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर व समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवाराने केले आहे.

# जुनैरा मेहरिन व अलविरा फातेमा यांचा पहिला रोजा पूर्ण

**तभा. वृत्तसेवा**

**बीड, प्रतिनिधी |** सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू असून सर्वत्र भक्तीभाव, आनंद आणि आध्यात्मिक वातावरण अनुभवायला मिळत आहे. या पवित्र महिन्यात रोजा (उपवास) ठेवणे फर्ज मानले जाते. त्यामुळे महिला, पुरुष, युवक-युवती यांच्यासह लहान मुले-मुलीही उत्साहाने रोजे ठेवून नमाज अदा करतात व कुरआन पठण करून अल्लाहची इबादत करतात.

याच पार्श्वभूमीवर बीड येथील ॲड. रईस पठाण यांची पुतणी तथा इम्रान पठाण यांची कन्या जुनैरा मेहरिन (वय ९ वर्षे) आणि अलविरा फातेमा (वय ७ वर्षे) या दोन चिमुकल्यांनी मंगळवार, दि. ३ मार्च रोजी आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण केला. दिवसभर उपवास पूर्ण करून त्यांनी अत्यंत श्रद्धा व संयमाने अल्लाहची इबादत केली. पहिल्या रोजाच्या निमित्ताने संध्याकाळी सूर्यास्तानंतर मोमीनपुरा बायपास रोड येथील सिटी लॉन्स येथे त्यांचा इफ्तार कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी दोन्ही मुलींचा पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला.



# हाळम येथे आज स्वामी डॉ. तुळशीराम गुट्टे महाराजांचे कीर्तन

**तभा. वृत्तसेवा**

**परळी |** तालुक्यातील हाळम येथे दिनांक २८ तारखेपासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला प्रारंभ झाला असून ग्रामस्थांच्या भव्य नियोजनातून आणि आध्यात्मिक वातावरणात हा सोहळा हाळम नगरीत उत्साहात सुरू आहे. सप्ताहमध्ये दररोज दुपारी ज्ञानेश्वरी भावकथा निरूपण तर सायंकाळी भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



या कीर्तन महोत्सवात आज शुक्रवार दि.६ रोजी नाशिक येथील प्रसिद्ध कथाकार, कीर्तनकार तसेच संत साहित्यिक ह.भ.प स्वामी डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांच्या जागराच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. गुट्टे महाराज हे संत साहित्यातील गाढे अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांनी ओंकारेश्वर दर्शन, शंकराचे बिल्वदल, श्री गणेश स्तुती, सार्थ गणेश स्तुती, यशस्वी जीवनाचा मार्ग, मुक्ताई झाली प्रकाश, संत केदारी महाराजांची पंचक्रोशीतील महती, संत मुक्ताई पालखी सोहळा, जीवन सार सूत्र, द पाथवे टू अ सक्सेसफुल लाईफ, मनोविश्वाचा आध्यात्मिक प्रवास अशी अनेक पुस्तके प्रकाशित केली असून समाज, अध्यात्म आणि आत्मविकास क्षेत्रातील त्यांच्या कार्याची ती साक्ष आहेत.

# संतांच्या नामस्मरणाने पुण्यवंत होता येते- हभप सुरेश महाराज जाधव

## नन्नवरे वस्ती हजारो भाविकांच्या उपस्थितीत वाटचालीचे कीर्तन संपन्न

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** संत एकनाथ महाराज नाथषष्ठी यात्रेनिमित्त बीडच्या श्री श्रीक्षेत्र नेकनूर येथील संत बंकटस्वामी महाराज यांच्या पालखीसह दिंडीचे आज पैठण कडे प्रस्थान झाले. संत बंकट स्वामी महाराज यांच्या पालखीसह दिंडीला पैठणमध्ये मानाचे स्थान आहे. ८० वर्षाची अखंड परंपरा सांभाळत या दिंडीत शेकडो वारकरी सहभागी झाले होते. यावेळी टाळ मृदंगाच्या जयघोषात बाल वारकरी दंग झाले होते. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पालखीने प्रस्थान ठेवले.. यावेळी नेकनूर मधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला

संतांच्या नामस्मरणाने पुण्यवंत होता येतं. देवाला संतांची सेवा केलेला आवडतं. त्यामुळे संतांचे नाव स्मरण करावे, पुण्याची प्राप्ती आणि पापाची निवृत्ती होते. संतांच्या चरणाजवळच विश्रांती मिळते. देवप्राप्ती आणि जीवाचा उद्धार ही संतांच्या आशीर्वादाची शिदोरी आहे असेही महाराज म्हणाले..



पुष्पहार अर्पण करण्यात आला तर तसंच प्रतिवर्षा प्रमाणे हजरत सय्यद इब्राहिम शाह दर्ग्याला पुष्पहार अर्पण केला. हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा आठ दशकांची परंपरा आहे. दिंडीतील वारकऱ्यांना वाटा लावण्यासाठी हजारो भाविक भक्त उपस्थित होते.. नन्नावरे वस्ती या ठिकाणी हजारो भाविकांच्या उपस्थितीत सुरेश महाराज जाधव यांचे कीर्तन पार पडले.

प्रति वर्षाप्रमाणे श्रीक्षेत्र नेकनूर येथून संत सुदामदेव महाराज यांनी सुरू केलेल्या स्वामी महाराज यांच्या पालखीसह दिंडी सोहळ्याचे आज पैठण कडे प्रस्थान झाले. यावेळी हजारो वारकरी दिंडी सोहळ्यात सहभागी झाले होते. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत समाधीची पूजा करून पालखी सोहळा पैठण कडे रवाना झाला.. यावेळी श्री ह भ प प्रा नाना महाराज कदम, श्रीकृष्ण महाराज यादव, वसंत महाराज शिंदे, रंजीत महाराज शिंदे अच्युत महाराज घोडके, दिनेशानंद महाराज काळे, विश्वस्त मंडळी, अन्नदान कमिटी तरुण मंडळी यांचे उपस्थित होते..

नन्नावरे वस्ती येथे बंकट स्वामींची दिंडी आल्यानंतर वस्तीवरील नागरिकांनी मोठा थाटात स्वागत केले यावेळी कलशधारी महिला आणि टाळ मृदंगाचा जयघोष करत सगळे वारकरी भक्तीचा नाहून निघाले होते. यावेळी सुरेश महाराज जाधव यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले.. कीर्तनानंतर उपस्थित वारकऱ्यांना महाप्रसादाचे पंगत पार पडली. नन्नवरे वस्तीवरील सर्व तरुण मंडळी, संयोजकांनी वारकऱ्यांची उत्तम व्यवस्था केली..

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पदविधर मतदारांसाठी अंतिम यादी जाहीर; नोंदणी सुरूच

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मार्च -**

भारत निवडणूक आयोगाने दि.१२ सप्टेंबर २०२५ रोजीच्या पत्रान्वये जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदविधर मतदारसंघाची अंतिम मतदार यादी दि.१२ जानेवारी रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरही नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत संबंधित पदविधर मतदारसंघासाठी मतदार नोंदणीची प्रक्रिया निरंतर सुरू ठेवण्याबाबत आयोगाने निर्देश दिले आहेत.

त्यानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदविधर मतदारसंघासाठी अद्याप नोंदणी न झालेल्या पात्र पदविधरांना अर्ज करण्याची संधी उपलब्ध राहणार आहे.

यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व पात्र पदविधर मतदारांनी आपले अर्ज संबंधित तहसील कार्यालयात तात्काळ सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.



# जिल्ह्यात पं.स. सभापती निवडीसाठी राजकीय तणाव!

**पंचायत समित्यांवरील सत्तास्थितीच धाराशिव जिल्हा परिषद अध्यक्ष पद निवडणुकीचा नवीन युती फॉर्मुला ठरवेल...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मार्च -**

जिल्हा परिषदेवर आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी भाजप आणि शिवसेना पक्षनेते सध्या तालुका निहाय युतींमध्ये मग्न झालेले दिसून येत आहेत. जिल्ह्यातील आठ पंचायत समितीसाठी धाराशिव, तुळजापूर, उमरगा, लोहारा, कळंब, भूम, वाशी आणि परंडामध्ये ६ मार्च रोजी सभापती आणि उपसभापती निवडणुका होणार आहेत.

जिल्ह्यातील महायुतीने बहुसंख्य पंचायत समित्यांवर वर्चस्व मिळवले आहे. मात्र, सभापती व उपसभापती पदासाठी पक्षांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरु आहे. पंचायत समिती सभापती, उपसभापती पदासाठी अनेक जण दावेदार आहेत. मात्र राजकीय पक्षांनी अद्याप कोणाही नावे जाहिर केलेले नाहीत. त्यामुळे आजच्या निवडीत एकमेकांना धक्कातंत्र आयुधाचा वापर नक्कीच केला जाणार.

जिल्ह्यातील ८ फेब्रुवारी रोजी झालेल्या पंचायत समिती निकालांनुसार धाराशिव, तुळजापूर आणि उमरगा येथे भाजपच्या सदस्यांची संख्या जास्त आहे. लोहारा पंचायत समितीत महायुतीचे वर्चस्व कायम आहे, तर कळंब पंचायत समितीत भाजप व उद्धव शिवसेना प्रत्येकी आठ-आठ जागा मिळाल्या आहेत. भूम, वाशी व परंडा या तिन्ही पंचायत समित्यांवर शिवसेना शिंदे गटाचे आमदार तानाजी सावंत यांचे प्रभुत्व दिसून येत आहे.



भाजपचे जिल्हा नेते आमदार राणाजगजितसिंह पाटील तालुका निहाय युती करीत असून, माजी मंत्री तानाजी सावंत, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, बसवराज पाटील, सुजितसिंह ठाकूर यांच्या माध्यमातून पंचायत समित्यांवर सत्तास्थापनेसाठी प्रयत्न सुरू आहेत.

जिल्ह्यातील धाराशिव पंचायत समिती सर्वसाधारण, तुळजापूर सर्वसाधारण, भूम सर्वसाधारण, कळंब सर्वसाधारण महिला, परंडा सर्वसाधारण महिला, उमरगा अनुसूचित जाती, लोहारा ओबीसी, वाशी ओबीसी महिला असे आरक्षण निश्चित झालेले आहे. महायुतीत ज्या पक्षांचे सदस्य जास्त त्यांना जिल्हा परिषद अध्यक्षपद असे समीकरण ठरलेले होते, याच पध्दतीने पंचायत समिती सभापती निवडीच्या बाबतीत समीकरण राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नेते मंडळी पदवाटपाचा फॉर्मुला कसा ठरविणार याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.




राजकीय विश्लेषकांचा अंदाज आहे की आठही पंचायत समित्यांमध्ये सभापती व उपसभापती पदासाठी महायुतीत रस्सीखेच दिसेल. पंचायत समित्यांवरील सत्तास्थितीचं जिल्हा परिषद अध्यक्ष पद निवडणुकीचा नवीन युती फॉर्मुला ठरवेल.

## बेडगा येथे शनिवारी ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर’

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ मार्च -**

तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे तात्काळ निराकरण व्हावे तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख व कार्यक्षम व्हावे या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

हे शिबीर शनिवार, दि.७ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत भारत विद्यालय, बेडगा येथे होणार आहे. या शिबिरात नागरिकांना १५ पेक्षा अधिक महसुली सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

शिबिरात भोगवटदार वर्ग-२ जमिनीचे वर्ग-१ मध्ये रूपांतर, प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ वरील किरकोळ दुरुस्ती, डिजिटल सातबारा संदर्भात मार्गदर्शन तसेच ‘जिवंत ७/१२’ मोहिम अंतर्गत वारस नोंदी घेणे आदी सेवा दिल्या जाणार आहेत. तसेच उत्पन्न, रहिवासी, जात प्रमाणपत्रे व विविध प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात येणार आहे.

या शिबिराचा लाभ घेण्यासाठी बेडगा महसूल मंडळातील सर्व शेतकरी, विद्यार्थी व महिलांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. हे शिबीर जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे व तहसीलदार गोविंद येरमे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येत आहे.

## तेजस्विनी वायकर हिचा गावच्या शाळेत सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.५ मार्च -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढाळा हिच्यासाठी अभिमानाचा, आनंदाचा आणि प्रेरणेचा सुवर्णक्षण ठरला, जेव्हा शाळेची माजी विद्यार्थिनी तेजस्विनी बळीराम वायकर हिने इस्रो सहलीतून परत येत आपल्या यशाचा तेजोमय प्रवास सर्वांसमोर उलगडला.



धाराशिव जिल्ह्यातून स्पर्धा परीक्षेद्वारे निवड झालेल्या अवघ्या सात विद्यार्थ्यांमध्ये तेजस्विनीचा समावेश झाला होता. आज ती विद्यानिकेतन माध्यमिक आश्रम शाळा, शिंगोली येथे शिक्षण घेत असून आपल्या जिद्द, परिश्रम आणि चिकाटीच्या बळावर तिने आकाशालाच गवसणी घातली आहे.


## वडार समाजातील लोकप्रतिनिधी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.५ मार्च -**

परिश्रम, कष्ट आणि कौशल्याची परंपरा जपणाऱ्या वडार समाजातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी, उच्च पदस्थ अधिकारी तसेच गुणवंत विद्यार्थ्यांसह नगरपरिषद, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये यश मिळवलेल्या वडार समाजातील नवनिर्वाचित प्रतिनिधींचा यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण होते. राज्यभरातील वडार समाजातील नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी या सोहळ्यास उपस्थित होते.

या सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांना विशेष गौरवचिन्ह देऊन त्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करण्यात आले.



तसेच नव्याने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी सरपंच रामचंद्र आलूरे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, पंचायत समिती सदस्य रणवीर चव्हाण, संयोजक लक्ष्मण चौगुले, मधुकर अण्णा बंदपट्टे, शंकर चौगुले, रवी शिंदे, जालिंदर मंगळवेढेकर, लक्ष्मण विटकर, बाबुराव निंबाळकर, तुकाराम चव्हाण, हरीश वडर, मारुती विटलकर, शंकर विठ्ठलकर, शामराव विटकर, सुरज पवार, विकास माशाळ, अविनाश दांडेकर, अशोक अलकुंटे, मनोहर मधुकर, पंडित मंजुळे यांच्यासह आदि उपस्थित होते.

प्रास्ताविक उद्योजक लक्ष्मण चौगुले, सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे तर मच्छिंद्र चौगुले यांनी आभार मानले.

## परंडा नगरपरिषदेच्या सभेत बाजार ठेका फेटाळला; व्यापाऱ्यांवरील दमदाटीचा मुद्दा गाजला

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ मार्च -**

परंडा नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा दि.४ मार्च रोजी आयोजित करण्यात आली होती. या सभेत जनशक्ती नगर विकास आघाडीच्या वतीने विविध मुद्दे उपस्थित करण्यात आले. त्यामध्ये आठवडी बाजार व दैनंदिन बाजाराच्या कर वसुली ठेक्याचा मुद्दा विशेष चर्चेत राहिला.



दोन दिवसांपूर्वी नगरपालिकेच्या कर वसुली ठेकेदाराने व्यापारी तसेच शेतकऱ्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत कराची रक्कम जमा करण्याची धमकी दिल्याची तक्रार करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर सभागृहात झालेल्या चर्चेनंतर आठवडी बाजार व दैनंदिन बाजाराचा लिलाव ठेका बहुमताने फेटाळण्यात आला.

या ठेक्याच्या अनुषंगाने ठेकेदाराकडून किरकोळ व ठोक विक्रेत्यांकडून तसेच शेतकऱ्यांकडून कर संकलन करताना नगरपालिकेने निश्चित केलेल्या रकमेपेक्षा जादा पैसे वसूल केले जात असल्याच्या तक्रारी आल्या होत्या. याशिवाय विक्रेत्यांना व शेतकऱ्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व दमदाटी केल्याच्या घटनाही समोर आल्याचे सांगण्यात आले.

सभेत जनशक्ती नगर विकास आघाडीच्या वतीने हा ठेका देण्याऐवजी नगरपरिषदेकडूनच कर्मचाऱ्यांमार्फत नियमानुसार कर वसुली करावी व त्यासाठी अधिकृत पावती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी जनशक्ती नगर विकास आघाडीचे उपनगराध्यक्ष समरजीतसिंह सुजितसिंह ठाकूर, गटनेते अनिल शिंदे, बांधकाम सभापती रत्नमाला राहुल बनसोडे, पाणीपुरवठा सभापती रमेशसिंह परदेशी, महिला व बालकल्याण सभापती परवीन मन्नान बासले, नगरसेवक अब्बास मुजावर, श्रीकृष्ण विधाते, मदनसिंह सद्दीवाल, इस्माईल कुरेशी तसेच नगरसेविका वैशाली सोमनाथ अलबते, रुखियाबी जकेरिया दहेलूस, महिनाबी खाजा पठाण व रुक्साना रहिमतुल्ला पठाण उपस्थित होते.

## नळदुर्गच्या विकासासाठी सर्वपक्षीय एकजूट गरजेची

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ मार्च -**

नळदुर्ग शहराचा रखडलेला विकास पुन्हा मार्गी लागून सर्वांगीण प्रगती व्हावी, या अपेक्षेने दोन महिन्यांपूर्वी झालेल्या नगरपालिका निवडणुकीत नागरिकांनी भाजप-सेना महायुतीच्या ताब्यात सत्ता दिली.

मात्र त्याचबरोबर काँग्रेसलाही भरघोस पाठिंबा देत २० पैकी ९ नगरसेवक निवडून दिले. त्यामुळे शहर विकासाची जबाबदारी जितकी सत्ताधारी भाजप-सेनेची आहे, तितकीच काँग्रेसचीही असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी आणून विविध विकासकामे मंजूर केली. त्यातून काही कामे पूर्ण झाली असली तरी अनेक ठिकाणी निधीचा विनियोग नियोजनबद्ध झाला नसल्याची चर्चा आहे. परिणामी काही कामे अर्धवट असून काहींची सुरुवातही झालेली नाही.




सध्या शहरात नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. हे काम आमदारांच्या प्रयत्नांतून सुरू झाले असून ते शहरासाठी महत्त्वाचे मानले जात आहे.

मात्र या योजनेची गती संथ असल्याने ते लवकर पूर्ण व्हावे, यासाठी नगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

दरम्यान, प्रशासकीय कालावधीत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप काँग्रेस नगरसेवकांनी केला आहे.

या आरोपांची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी एकत्रितपणे पुढाकार घेणे आवश्यक आहे.

## सारोळा शाळेची शैक्षणिक सहल संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मार्च -**

जिल्हा परिषद सारोळा (बुद्रुक) शाळेच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या शैक्षणिक सहलीत इतिहास, निसर्ग आणि सांस्कृतिक वारसा यांचा अनुभव घेता आला. गेल्या दोन वर्षांपासून शाळेत शैक्षणिक सहली आयोजित केल्या जात आहेत, आणि यंदाची सहल विद्यार्थ्यांसाठी खूपच रोमांचक ठरली.

सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी शिखर शिंगणापूर, वाई, महाबळेश्वर, प्रतापगड किल्ला, दुर्गदुर्गेश्वर किल्ला आणि रायगड किल्ला, महाड येथील चवदार तळे, हरिहरेश्वर बीच, मुरुड जंजिरा आदी ठिकाणे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक घटनांचे, निसर्गाचे, पर्यटन स्थळांचे आणि भौगोलिक संकल्पनांचे प्रत्यक्ष अनुभव घेता आले. शाळेच्या मुख्याध्यापक तानाजी वनकळस यांच्या नेतृत्वाखाली, सहल विभाग प्रमुख विशाल सूर्यवंशी यांनी सहलीचे आयोजन केले.

राजेंद्र अंग्रखे, नानासाहेब सावंत, अनिता सूर्यवंशी, सुमित्रा आटपळकर, उर्मिला देवगिरे, बाळासाहेब कठारे यांचे सहकार्य लाभले.

## राज्यस्तरीय संविधान गुणगौरव परीक्षेत उमरगा (चि.) केंद्राचा उज्ज्वल यश

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.५ मार्च -**

भारतीय राज्यघटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित राज्यस्तरीय संविधान गुणगौरव परीक्षा २०२५-२६ मध्ये उमरगा (चि.) केंद्राने उल्लेखनीय यश मिळवले.




जि.प. प्राथमिक शाळा उमरगा (चि.) येथे घेण्यात आलेल्या केंद्रस्तरीय परीक्षेत इयत्ता सहावीतील कुमारी ज्ञानेश्वरी एकनाथ जाधव हिने प्रथम क्रमांक पटकावत शाळेचा व परिसराचा मान उंचावला.

या परीक्षेसाठी एकूण २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये प्रथम क्रमांक ज्ञानेश्वरी एकनाथ जाधव (इ.६ वी), द्वितीय क्रमांक प्रगती अण्णाराव कदम (इ.७ वी) व तृतीय क्रमांक आयान अझरोद्दीन पिंजारी (इ.७ वी) यांनी मिळवला. यशस्वी विद्यार्थ्यांचा जिल्हास्तरावर आ. प्रवीण स्वामी यांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

संविधान दिनानिमित्त आयोजित या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता, लोकशाही मूल्यांची जपणूक व समज वाढीस लागल्याचे सांगण्यात आले.

या यशासाठी शाळेचे मुख्याध्यापक एस.एस. कांबळे तसेच शिक्षक एम.पी. सालेगावकर, एस.एस. स्वामी, पोतदार, काळे, राजगुरु, राठोड व कोरे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# आरळी खुर्दची झेडपीची शाळा गुणवत्तेत कात टाकतेय!

**अनिल आगलावे**
**तुळजापूर, दि.५ मार्च -**

तालुक्यातील आरळी खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केवळ अभ्यासक्रमापुरते शिक्षण न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध बौद्धिक उपक्रम राबवित आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, वाचन संस्कृती जोपासणे, गणित व विज्ञान प्रयोग उपक्रम, तसेच व्यक्तिमत्व विकास कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता सातत्याने उंचावत आहे.

आरळी खुर्दची शाळा आज ग्रामीण भागातील इतर शाळांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. नियोजन, परिश्रम, सकारात्मक दृष्टीकोन आणि सामूहिक सहकार्य यांच्या जोरावर ग्रामीण विद्यार्थीही मोठी झेप घेऊ शकतात, हे या यशाने सिद्ध केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षेत यश मिळवून दाखविल्याने शाळेची गुणवत्तेची परंपरा, यशाची हमी ही ओळ पुन्हा एकदा सार्थ ठरली आहे.

**शिक्षकांचे योगदान : व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांचे सहकार्य...**

या यशामुळे परिसरातील पालकांमध्ये शाळेबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला असून पुढील वर्षी आणखी मोठे यश मिळविण्याचा शाळेचा निर्धार आहे.

आरळी खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखत यंदाच्या एनएमएमएस स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

ग्रामीण भागातील साधन सुविधा मर्यादित असतानाही विद्यार्थ्यांनी केलेली ही कामगिरी संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

नियमित विशेष मार्गदर्शन वर्ग, आठवड्याला सराव परीक्षा,वैयक्तिक प्रगतीचे विश्लेषण, कमकुवत घटकांवर स्वतंत्र लक्ष, पालकांशी सातत्यपूर्ण संवाद या सर्व घटकांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आणि स्पर्धा परीक्षेचा ताण कमी झाला.



शिक्षकांनी शाळेच्या नियमित वेळेनंतरही अतिरिक्त वेळ देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक राजकुमार म्हेत्रे, आदेश वाघमारे, अभिजित धाबेकर, भूषण ठाणबिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सुखदेव भालेकर, योगिता शिनगारे, श्रीमती वर्षा कोल्हाळे आणि शिक्षणप्रेमी ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांचे सहकार्य शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुभाष सोमवंशी, उपाध्यक्ष दीपक पुरी, सदस्य लक्ष्मण पारवे तसेच सर्व सदस्य शाळेला सातत्याने पाठबळ देत आहेत.


**जाहीरनामा**

**उस्मानाबाद येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**सक्शेशन प्रमाणपत्र बद्यल जाहीरनामा**

सीएनआर-एमएचओएस०२-०००२५३२०२६
किरकोळ अर्ज क्रं. १३६/२०२६
सुनिता/निरंक
निशाण क्रमांक-६

ज्यापेक्षा मयत **कै. प्रमोद गोरख कलमकर, रा. उपळे मा., ता. जि. धाराशिव**, हे दिनांक ३१/१२/२०१७ रोजी किंवा त्यासुमारास मौजे उपळे मा. ता.जि. धाराशिव येथे मयत झाले असून अर्जदार **१. सुनिता प्रमोद कलमकर, २. अनुराधा श्रीकांत भड, ३. पल्लवी सुधाकर पाटील**, यांनी हया कोर्टास सदरहू मयत कै. प्रमोद गोरख कलमकर यांच्या नावचे सक्शेशन प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदारास सदरहू प्रमाणपत्र हे मयताच्या पश्चात मयताच्या नावावर असलेले सेंट्रल रिझर्व पोलीस फोर्स येथील फॅमीली पेन्शनबाबत सक्शेशन प्रमाणपत्र मिळावे या करीता संबंधीत अर्जदारांचे नावे वारसा हक्काने नांव लावणेकामी सकेशन प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सदरहू अर्जदार मयत **कै. प्रमोद गोरख कलमकर** यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्यांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याचा सदरहू मयत **कै. प्रमोद गोरख कलमकर** चे सक्शेशन प्रमाणपत्र देईल.

**दिनांक १३.०२.२०२६ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**
**पुढील नेमलेली तारीख- २३/०३/२०२६**

स्वाक्षरित/-
(व्ही.के. बेग)
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/-
(एस.एम. नावडे)
सहा.अधिक्षक

दिवाणी न्यायालय, व. स्तर, उस्मानाबाद

# जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचा पहिला टप्पा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ मार्च-**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाच्या पहिल्या टप्यामध्ये शासनाच्या सुचनेप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील सर्व मंडळस्तर व नगरपरिषद-नगरपंचायत स्तरावर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात महसूल विषयक प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येणार आहेत. तसेच लोकसेवा हक्क कायद्यानुसार प्रमाणपत्रांचे वितरण, सामाजिक अर्थसहाय्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ मंजूर करण्यात येणार आहेत,

**अभियानमुळे देगलूरात**
**महसूल सेवेला नवा वेग**

**देगलूर-** महसूल विभागाच्या कामकाजात पारदर्शकता, गती आणि नागरिकाभिमुखता आणण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व समाधान अभियान (टप्पा-१)' अंतर्गत देगलूर तालुक्यात सात महसूल मंडळांमध्ये विशेष समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. यात पारदर्शक कार्यपद्धती, जलद सेवा व नागरिकांना थेट लाभ होणार असून उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांनी आवाहन केले आहे.

'छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व समाधान अभियान (टप्पा-१)' अभियानामुळे गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या फेरफार, वारस नोंदी, प्रमाणपत्रे आणि अभिलेख दुरुस्ती यांसारख्या प्रकरणांना गती देण्यासाठी प्रशासनाने ही मोहीम हाती घेतली आहे. त्यामुळे नागरिकांना तहसील कार्यालयाच्या वारंवारच्या फेऱ्यांपासून मोठा दिलासा मिळणार आहे.

नागरिकांची होणारी हेळसांड थांबणार आहे. तहसील कार्यालयाच्या होणाऱ्या फेऱ्यांना ब्रेक लागण्याची दाट शक्यता आहे. या अभियानामुळे विविध प्रश्नांचा तत्काळ निर्णय गावातच होणार आहे. या शिबिरांमध्ये शेतकरी, महिला, विद्यार्थी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींची जागेवर सुनावणी करून शक्य त्या प्रकरणांचा तत्काळ निपटारा केला जाणार आहे. प्रकरणे प्रलंबित राहू नयेत, यासाठी संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी शिबिरस्थळी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

**एकाच छताखाली विविध सेवा**

'छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व समाधान अभियान (टप्पा-१)' अभियानामुळे कामे एकाच छताखाली होणार आहेत. यामध्ये फेरफार नोंदी, ७/१२ व ८अ उतारे, वारस (बारसा) नोंद, अभिलेख दुरुस्ती, उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्रे, लोकसेवा हक्क कायद्यातील सेवा, विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन या सर्व योजनांची अंमलबजावणी एकाच छताखाली होणार आहे. विशेष म्हणजे, अर्ज स्वीकारणे, पडताळणी आणि निर्णय प्रक्रिया एकाच दिवशी पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे.

उपजिल्हाधिकारी अनुप पाटील व तहसीलदार भरत सूर्यवंशी यांनी नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित दिवशी उपस्थित राहून या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. या अभियानात नागरिकांना जलद, पारदर्शक व परिणामकारक सेवा देणे हेच आमचे ध्येय आहे. गावपातळीवर प्रशासन पोहोचवून प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या अभियानामुळे महसूल विभागाविषयी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होणार असून शासन-प्रशासन आणि जनतेतील संवाद अधिक सुदृढ होण्यास मदत होणार आहे. देगलूर तालुक्यात या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**समाधान शिबिरात जनतेनी सहभाग**
**नोंदवावा:तहसीलदार परळीकर**

**लोहा-**महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी पोहोचवून प्रशासन अधिक गतिमान करणे .नागरिकांच्या दैनंदिन तक्रारींचे एकाच ठिकाणी तात्काळ निवारण करणे ,डिजिटल सेवांचा वापर करणे यासाठी तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान ७ मार्च ते ८ मे या काळात सर्कल निहाय समाधान शिबिराचे उपविभागीय अधिकारी विलास नरवटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे. सर्व सोनखेड सर्कलमधील नागरिकांनी ७ मार्चच्या शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी केले.

विविध प्रमाणपत्रासाठी कार्यालयात हेलपाटे न घालता, नागरिकांना त्यांच्या हक्काचे दाखले, कागदपत्रे आणि योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. शासन आपल्या दारी या योजनेला बळकटी देण्यासाठी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

लोहा तालुक्यात मंडळ निहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. सोनखेड येथे ७ मार्च रोजी तहसील प्रशासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर टप्पा १ चे आयोजन सोनखेड येथील हनुमान मंदिर पोलीस स्टेशन च्या समोरील परिसरात संपन्न होणार आहे.

या शिबिरात विविध दाखले वाटप करण्यात येणार,सात- बारा अद्यावत करणे, प्रलंबित फेरफार निकाली, ई-मोजणी पाणंद रस्त्याबाबत कार्यवाही, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क ॲग्रिस्टक, पी.एम. किसान, तुकडेबंदी कायद्याच्या अनुषंगाने कार्यवाही, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचा लाभ, लोकसेवा हक्क कायदा तात्काळ सेवा इतर अनुषंगिक विषय या बाबत निराकरण केले जाणार आहे.

**उमरी तालुक्यात महसुल मंडळातील तक्रारीचा ऑन द स्पॉट निपटारा होणार : तहसीलदार मंजुषा भगत**

**उमरी -**महसूल विभागाच्या सेवा अधिक पारदर्शक ,गतिमान व नागरिकभिमुख करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने ' छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान ( टप्पा १) राबविण्यात येत आहे.

उमरी तालुक्यातील सर्व महसूल मंडळामध्ये विशेष समाधान शिबिराचे आयोजन करण्यात येत असुन नागरिकांच्या प्रलंबित महसूल प्रकरणाचा ऑन द स्पॉट निपटारा करण्यावर भर देण्यात येत आहे तरी शेतकरी,महिला, विद्यार्थी , व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकाच्या विविध तक्रारी व अर्जाची तात्काळ दखल घेवुन मार्गदर्शन व निर्णय देण्यासाठी संबधित अधिकारी शिबिरस्थळी उपस्थित राहणार आहेत.

तहसिल कार्यालयातील वारंमवार फेऱ्या टाळून गावपातळीवरच सेवा उपलब्ध होणार आहे तरी नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार मंजुशा भगत व नायब तहसीलदार संजय सोलंकर यांनी केले आहे.

या अभियानाची सुरुवात दि.७ मार्च रोजी सिंधी,१४ मार्च रोजी गोळेगाव व १० एप्रिल रोजी धानोरा बु. व ८ मे रोजी उमरी येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

तालुक्यातील प्रत्येक मंडळात स्वतंत्र दिवशी शिबिर भरवुन फेरफार नोंदी,७/१२,८ अ.उतारे,वारसा नोंद, अभिलेख दुरूस्ती, उत्पन्न, रहिवासी,जात,व नॉनक्रीमीलीयर प्रमाणपत्र, लोकसेवा हक्क कायद्यातील सेवा तसेच भोगवटदार वर्ग २ चे १ करणे,तलाठी स्तरातील विषय निहाय प्रलंबित प्रकरणाची यादी तयार करुन प्रकरण निकालीवरून काढण्यात येणार आहे,विविध सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभार्थी यांचे अर्ज भरुन मंजुरी देण्यात येईल अशा विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन अदि सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करुन देण्यात येणार आहे प्रलंबित प्रकरणाला गती देण्यासाठी व नागरिकांना त्वरीत दिलासा मिळावा या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या या अभियानाचा तालुक्यातील नागरिकांनी पुरेपुर लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार सौ.मंजुषा भगत व नायब तहसीलदार संजय सोलंकर यांनी केले आहे.

**शिबिर अभियानाचा नागरिकांनी**
**लाभ घ्यावा :तहसीलदार अभिजित जगताप**

**माहूर -**महसूल व वन विभाग १८/०२/२०२६ शासन निर्णयानुसार महसूल विभाग सामान्य नागरिकांच्या दारी आणून समस्यांचे त्वरित निवारण करणे, हा मुख्य उद्देश असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान (टप्पा-१) महाराष्ट्र सरकारच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येत आहे. याअंतर्गत नागरिकांच्या महसूल विषयक समस्या व प्रलंबित कामे थेट शिबिर स्थळी निकाली काढण्यासाठी

तहसील कार्यालय माहूरद्वारे ०७ व १४ मार्च,१० एप्रिल व ०८ मे रोजी अधिकृत अभियान राबविण्यात येत असून,मंडळ स्तरावर दाखले, जमिनीचे विषय, पट्टे वाटप इत्यादी सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन तहसीलदार अभिजित जगताप यांनी केले आहे.

लोकाभिमुख प्रशासनाकडून महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी पोहोचवून प्रशासन अधिक गतिमान करणे.नागरिकांच्या दैनंदिन महसूल विषयक तक्रारींचे एकाच ठिकाणी तात्काळ निवारण करणे.७/१२, डिजिटल ७/१२, ८अ उतारे आणि सिंगल डे सर्विस डिलिव्हरी प्रणालीचा प्रभावी वापर करणे. यासह इतर सुविधांचा समावेश असलेल्या

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान (टप्पा-१)महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला यांच्या मार्गदर्शनाखाली माहूर तहसील कार्यालय अंतर्गत वानोळा, सिंदखेड, वाई बाजार आणि माहूर या चारही मंडळात हे शिबिर अभियान आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात महसूल दस्तऐवज महसूल दस्ताऐवज प्रलंबित फेरफार निकाल, ७/१२ दुरूस्ती, डिजिटल ७/१२ व ८अ उतारा वितरण.लोकसेवा हक्क दाखले उत्पन्न रहिवासी, जात आणि नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्रे,सिंगल विंडो प्रणाली एकाच ठिकाणी अर्ज स्वीकारणे, पडताळणी आणि तात्काळ सेवा वितरण यासह विविध सेवा देण्यासाठी तहसीलदार व नायब तहसीलदार पर्यवेक्षण, समन्वय आणि शिबीर प्रभारी मंडळ अधिकारी व तलाठी स्थानिक नियोजन अर्ज स्वीकारणे, कागदपत्रांची पडताळणी आणि सेवा अद्ययावत करणे.सनियंत्रण व अहवाल डॅशबोर्ड प्रपत्र अ-१ ते अ-६ अधिकृत अहवाल नमुना फेरफार निकाली काढणे, ७/१२ दुरूस्ती अर्ज, डिजिटल ७/१२ वितरण आणि प्रमाणपत्र वितरणाचा दैनंदिन प्रगती अहवाल सादर होणार आहे

छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियान अभियान टप्पा-१ ची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे विविध दाखले (उत्पन्न, जाती, अधिवास),जमीन अभिलेख दुरुस्ती, फेरफार नोंद, पट्टे वाटप (सर्वांसाठी घरे).शेतकरी व महिलांशी संबंधित महसूल प्रलंबित कामे ही शिबिर स्थळी केली जाणार आहेत.

त्यामुळे नागरीकानी आवश्यक कागदपत्रांसह आपल्या संबंधित मंडळाच्या शिबीराच्या दिवशी आवश्यक मूळ कागदपत्रे व छायांकित प्रतींसह वेळेवर उपस्थित राहावे,असे आवाहन तहसीलदार अभिजीत जगताप यांनी केले आहे.हे अभियान ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी कार्यालयात चकरा मारण्यापासून दिलासा देण्यासाठी निश्चितच महत्त्वाचे ठरणार आहे.

# 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये 'आयरिन्स व इन्फ्लिबनेट सेवा' राष्ट्रीय कार्यशाळा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ मार्च-**

उच्च शिक्षण क्षेत्रातील संशोधक आणि प्राध्यापकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणारी 'आयरिन्स व इन्फ्लिबनेट सेवा' विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा दि.१६ मार्च, २०२६ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठ आणि इन्फ्लिबनेट सेंटर, गांधीनगर (गुजरात) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

युजर अवेअरनेस प्रोग्राम ऑन आयरिन्स अँड इन्फ्लिबनेट सर्व्हिसेस फॉर स्कॉलरली कम्युनिटीज या विषयावर आधारित या कार्यशाळेत संशोधकांना जागतिक स्तरावरील संशोधन साधनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. 'आयरिन्स' (IRINS) हे भारतीय संशोधकांच्या शोधनिबंध व शैक्षणिक कार्याची नोंद ठेवणारे विनामूल्य वेब-पोर्टल असून, या माध्यमातून संशोधकांना त्यांच्या कार्याला जागतिक ओळख मिळवून देणे आणि शैक्षणिक नेटवर्क विस्तारण्यास मदत होते.

कार्यशाळेत इन्फ्लिबनेट केंद्रातील तज्ज्ञ शास्त्रज्ञ 'आयरिन्स', वन नेशन वन सबस्क्रिप्शन, विद्वान व शेर्नी पोर्टल, शोध-चक्र तसेच ऑर्किड या डिजिटल प्लॅटफॉर्मची माहिती देणार आहेत. ही कार्यशाळा सर्व विद्याशाखांतील सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, नॅक-आयक्युएसी समन्वयक, ग्रंथपाल आणि सक्रिय संशोधकांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर केवळ १०० ते १२० सहभागींची निवड करण्यात येणार असून, कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही. ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख १२ मार्च, २०२६ आहे. नोंदणी करताना प्राचार्य, विभागप्रमुख किंवा संशोधन मार्गदर्शक यांचे अधिकृत शिफारसपत्र जोडणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाचे आयोजन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार तसेच इन्फ्लिबनेटच्या संचालिका प्रो. देविका पी. मदल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. ज्ञान स्रोत केंद्राचे प्र. संचालक डॉ. जगदीश नरहरराव कुळकर्णी हे कार्यक्रमाचे समन्वयक आहेत.

इच्छुकांनी https://irins.org/irins-outreach या लिंकवर नावनोंदणी करावी. अधिक माहितीसाठी ज्ञान स्रोत केंद्राचे प्र. संचालक किंवा डॉ. अरुण हंबर्डे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

# माजी पालकमंत्री डी. पी. सावंत यांच्या उपस्थितीत जेष्ठ पत्रकार गोविंद नरसीकर यांचा वाढदिवस साजरा



**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ५ मार्च-**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा नांदेड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डी. पी. सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत नरसी येथील जेष्ठ, निर्भीड पत्रकार गोविंद टोकलवाड नरसीकर यांचा वाढदिवस गुरुवार दि. ५ मार्च २०२६ रोजी नरसी येथील भाजपा कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी भाजपा नेते तथा माजी पंचायत समिती सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते केक कापून आणि केक भरवून गोविंद नरसीकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांच्या पत्रकारितेतील धडाडीच्या, वस्तुनिष्ठ आणि समाजाभिमुख कार्याचे मनापासून कौतुक केले.

याप्रसंगी बोलताना माजी मंत्री डी. पी. सावंत यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना आवाज देणारी पत्रकारिता करणे ही मोठी सामाजिक जबाबदारी आहे. जेष्ठ पत्रकार गोविंद नरसीकर यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील अनेक प्रश्नांना न्याय देत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे. ते निर्भीडपणे पत्रकार म्हणून काम करत आहेत. असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी भाजपा नेते श्रावण पाटील भिलवंडे यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, गोविंद नरसीकर यांच्या लेखणीतून अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा मिळाली आहे. पत्रकारितेतील त्यांची प्रामाणिकता, धाडस आणि समाजाशी असलेली बांधिलकी यामुळे त्यांनी या क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र आणि सन्माननीय ओळख निर्माण केली आहे.

नायगाव तालुक्यात अनेक ठिकाणी गोविंद नरसीकर यांचा वाढदिवस साजरा करत शुभेच्छा दिल्या यावेळी जेष्ठ पत्रकार सुर्यकांत सोनखेडकर, पंडीत वाघमारे, नरसी येथील पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, श्री तुळजाभवानी जिनिंग अँड प्रेसिंगचे संचालक वसंतराव कस्तुरे, गंगाधर गंगासागरे, कैलास तेलंग, आनंदराव सुर्यवंशी, शेषराव कंधारे, ज्ञानेश्वर तोडे, प्रल्हाद भंडारे, गणेश कंदुरके, लोहगाव येथील गंगा लॉन्सचे मालक रमेशजी शेटकर, दत्ता पाटील होटाळकर, नरसी येथील उद्योजक साईनाथ अक्कमवाड, सामाजिक कार्यकर्ते त्र्यंबक डाके, भाजपा कार्यकर्ते डी. बी. भिलवंडे, मारोतराव बुके, लक्ष्मण बोधने, व्यंकट नागेश्वर यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी गोविंद नरसीकर यांना पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात अधिक यश मिळावे, अशा मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. मित्रपरिवार, सहकारी पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनीही त्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पत्रकारितेतील योगदानाचा गौरव केला.

## पूर्णा येथे सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**भोकर-**पूर्णा शहरातील तथा ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेच्या परिवारातील विवाह उपयूक्त परिवाराचे तथा सर्वधर्मीय नागरीक रहिवासी यांचे विवाह सोहळाचे आयोजन करण्यात आले आहे.ईच्छूकांनी आपले नाव नोंदणी करुन घ्यावी विवाहसोहळ्यात शेतकरी,कष्टकरी,मजूर व इतर पाल्याने विवाहास होणाऱ्या अर्थिक खर्चाला बळी न पडता या संधीचा लाभ घ्यावा तरी सर्वधर्मीय विवाह सोहळ्यासाठी इच्छूक असणाऱ्या पाल्याने आपले कागदपत्र घेवून संपर्क साधावा समाजातील गरजू वंचित घटकातील यूवक यूवतीसाठी एक सामाजीक बांधीलकीतून आयोजीत सामूहिक विवाह सोहळा लग्न हा प्रत्येकाचा हक्क आहे.अर्थिक अडचणीमूळे कोणीही या आनंदापासून वंचित राहून नये या उद्येशाने हा सामूहिक विवाह सोहळा आयोजीत करण्यात येत आहे सामाजीक उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. विवाह जोडप्यांच्या धर्म व परंपरेनूसार लावून देण्याचे निश्चित केले असून वधूचे वय १८ वराचे वय २१ वर्ष असेल वधू वराचे रहिवाशी प्रमाणपत्र आधार कार्ड टि.सी.ग्रा.पं.चा वयाचा दाखला दोन फोटो दि.२४मे२०२६ रविवारी जिल्हा परिषद शाळा बूध्द विहारा समोर पूर्णा येथे हा सर्वधर्मीय सामूहिक सोहळा पार पडणार आहे.सामाजीक न्याय विभागा तर्फे२५०० रु.अनूदान देण्यात येणार आहे.

## मुदखेड येथे चौथ्या धम्मपरीषदेचे आयोजन

**मुदखेड-**येथील नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने रविवार, दि. ०८ मार्च २०२६ रोजी 'चौथी धम्म परिषदे व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पूज्य भन्ते उपगुप्त महाथेरो (पूर्णा) यांच्या अध्यक्षतेखाली हि धम्म परिषद संपन्न होणार असून, या धम्म परिषदेमध्ये बौद्ध उपासक-उपासिकांना मार्गदर्शन लाभणार आहे. दिवसभराचे नियोजित कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ०८.०० वाजता



पूज्य भिक्खू डॉ. प्रा. सत्यपाल महाथेरो (मुळावा) यांच्या हस्ते पंचशील धम्म ध्वजारोहणाने होईल. त्यानंतर सकाळी ०९.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भिक्खू संघाची शहराच्या प्रमुख रस्त्यावरून भव्य मिरवणूक काढण्यात येईल.सकाळी ११.३० वाजता: भिक्खू संघाला भोजनदान (बुद्धभूमी प्रशिक्षण केंद्रात) उपासिका यांच्या हस्ते होणार आहे. दुपारी १२.३५ वाजता: प्रमुख धम्मदेसना बौद्ध प्रशिक्षण केंद्रात आयोजीत केली आहे. तसेच सायंकाळी ठिक ७:०० वाजता महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका नालंदा सांगवीकर आणि त्यांचा संच यांचा बुद्ध भिम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. उपस्थित मान्यवर:या परिषदेत डॉ. एस. पी. गायकवाड, समता सैनिक दल मुदखेड, तसेच पूज्य भिक्खू डॉ. खेमधम्मो महाथेरो, भिक्खू इंदवंश महाथेरो, भिक्खू ज्ञानरक्षीत थेरो यांच्यासह अनेक मान्यवर भिक्खू संघाची उपस्थिती व धम्मदेसना लाभणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भिक्खू शिलरत्न थेरो (नांदेड/मुदखेड), भन्ते गगण बोद्धी आणि मुदखेड येथील समस्त महिला मंडळ परिश्रम घेत आहेत.यासाठी सर्व बौद्ध उपासक-उपासिकांनी या धम्म परिषदेला वेळेवर आणि शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित राहावे, असे आवाहन नालंदा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# चिमुकल्यांनी पेटवली प्लास्टिक आणि कचऱ्याची होळी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ मार्च-**

होळी या सणानिमित्त जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनी प्लास्टिक आणि कचऱ्याची अनोखी होळी साजरी करुन पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याचा संदेश दिला. लाकडे, गोवऱ्या यांचा वापर न करता शाळा आणि शाळा परिसरातील कचरा गोळा करून तो पेटवून दिला. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, प्राथमिक पदवीधर शिक्षिका संगिता बडवणे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विशेष काळजी घेत होळी साजरी केली. यासाठी वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांनी मदत केली. त्यांनीच तयार केलेल्या नैसर्गिक रंगांचा वापर करुन आज धुलीवंदनाच्या निमित्ताने रासायनिक रंग वापरु नयेत असा संदेश यांद्वारे व सोशल मीडियाद्वारेही दिला आहे.

वर्षभरात शाळेकडून प्रसंगानुरुप तसेच शालेय सहशालेय उपक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविले जातात. प्लास्टिक आणि कचऱ्याची होळी साजरी केली करताना सर्वांना पर्यावरणाचे रक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी पाण्याचा गैरवापर टाळणे तसेच नैसर्गिक रंगाचा वापर करणे, इकोफ्रेंडली होळी साजरी करणे आदी संदेश देण्यात आला. इयत्ता पहिली व दुसरीच्या चिमुकल्यांकडून ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करण्यात आला. त्यानंतर प्लास्टिकच्या बाटल्या, विविध खाद्यपदार्थांच्या वस्तूचे वेष्टन, रॅपर्स, रिकाम्या पाणी बॉटल्स, प्लॉस्टिकचे ग्लास, पाणी पाऊच, कॅरीबॅग, इतर प्लास्टिक वेस्टेजेस अशाप्रकारच्या कचऱ्याला एकत्रित करून जाळून नष्ट करण्यात आले. याकामी मारोती चक्रधर, हरिदास पांचाळ आणि मनिषा गच्चे यांनी सहकार्य केले.

# राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन निवड जिल्हास्तरीय समितीचे पुनर्गठण !

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ मार्च-**

राजर्षी शाहू महाराज साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठीच्या गत तिन वर्षापासून रखडलेल्या नांदेड जिल्हास्तरीय समितीचे पुनर्गठण करण्यात आले आहे.बहुजन टायगर युवा फोर्स महाराष्ट्र (सांस्कृतिक विभाग) यांच्या लढ्याला यश आले असून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष त्रिरत्नकुमार मारोतीराव भवरे कामारीकर यांचीही या समितीत अशासकीय सदस्यपदी वर्णी लागली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी नामनिर्देशित केल्यानुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठीच्या १६ सदस्यीय जिल्हास्तरीय समितीत ९ कलावंत व १ साहित्यिक यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती केल्याचे पत्र दि.२ मार्च रोजी काढले आहे.

या समितीचे अध्यक्ष म्हणून स्वतः जिल्हाधिकारी तर,सदस्य सचिव म्हणून जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी हे आहेत. सदस्यपदी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी,नांदेड-वाघाळा मनपाचे उपायुक्त,छत्रपती संभाजीनगर सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सहाय्यक संचालक,जिल्हा परिषद जिल्हा समाजकल्याण अधिकारी या शासकीय अधिकाऱ्यांसह अशासकीय सदस्य म्हणून कलाकार गुरुनाथ पेंढारकर मुखेड,विठ्ठल मोगलाजी नावाडे बिलोली,बळीराम दिगांबर जाधव नायगांव, बाबाराव माधवराव थोटे कुरुळा कंधार, ह.भ.प.व्यंकटी तातेराव जाधव मुदखेड, त्रिरत्नकुमार मारोतीराव भवरे हिमायतनगर, ह.भ.प.व्यंकटराव मुकींदराव चेपूरवार हदगांव, बालाजी बुद्धाजीराव पाटील लोहा,सुनील व्यवहारे किनवट तसेच,साहित्यिक म्हणून बाबुराव पाटील भोकर यांचीही अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

महत्वपूर्ण बाब म्हणजे,मान्यवर वृद्ध कलावंत व साहित्यीक मानधनांचे सन् २०२३-२४ या वर्षातील प्रस्ताव जिल्हास्तरीय समिती पूनर्गठन नसल्याने रखडल्यानंतर,शासन परिपत्रकानुसार समिती नामकरणासह काही बदल करण्यात आले.त्यानुसारचीही राजर्षी शाहू महाराज साहित्यिक व कलावंत मानधन निवड जिल्हास्तरीय समिती पूनर्गठित नसल्याने सन् २०२३-२४ व २०२४-२५ व २०२५-२६ या तिन वर्षाचे अर्ज व प्रस्ताव शासनाकडून मागविण्यात आलेले असले तरिही त्यांची छाननी करुन पात्र ठरविण्यात आले नाहीत.यासाठीच्या समितीचे पूनर्गठन नसल्यानेच त्याबाबतची कार्यवाही थांबली होती. परिणामी आर्थिक मदतीविना लाभार्थींची परवड होत असल्याची बाब जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अतुल सावे यांच्या निदर्शनास आणून द्यावी व सदरची समिती पूनर्गठनाला पाठपुरावा करावा यासाठी बहुजन टायगर युवा फोर्स च्यावतिने समितीच्या सदस्या तथा,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पालकमंत्री ना.अतुल सावे यांनाही अनेकदा भेटून पाठपुरावा केला होता.तसेच,समिती पूनर्गठनासाठी जिल्हा परिषदेसमोर संघटनेच्यावतीने अनेकदा भजन आंदोलनेही केली होती.बहुजन टायगर युवा फोर्स महाराष्ट्र व सांस्कृतिक विभागाच्या या लढ्याला यश आलेले असून या समितीत अशासकीय सदस्य म्हणून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष त्रिरत्नकुमार भवरे यांचाही समावेश झाल्याने त्यांच्या कर्तव्यतत्परतेला बळ मिळाले असून संघटना व जिल्हाभरात लोकपारंपारिक कलावंताचा आनंद द्विगुणित झाल्याचे संघटनेचे प्रवक्ते लक्ष्मणराव मा.भवरे,शाहीर बापूराव जमधाडे,रवीराज भद्रे म्हणाले.

**आमचा लढा सुरुच राहिल : भवरे**



भारतीय संस्कृतीत लोकपारंपारिक कला जीवंत ठेवण्यासाठीच कलेच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे महान कार्य कलावंत करित असतात. त्यांना शासनाकडून देण्यात येत असलेली आर्थिक मदत वाढविण्यासह मान्यवर वृद्ध कलावंत,साहित्यिकांच्या न्याय व हक्कासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असून गत अनेक वर्षांपासूनच्या प्रलंबित मागण्या पुर्णत्वासह राज्यातील रखडलेल्या अनेक जिल्हास्तरीय समितींच्या पूनर्गठनासाठी आगामी काळात आंदोलनात्मक भूमिका घेत यापूढेही प्रसंगी आक्रमकपणे रस्त्यावर उतरुन संघर्ष करु असे बहुजन टायगर युवा फोर्स महाराष्ट्र व पारंपारिक शाहीर लोककला संवर्धन मंडळाचे संस्थापक अध्यक्ष त्रिरत्नकुमार मा.भवरे म्हणाले. नांदेड जिल्हास्तरीय समिती पूनर्गठित झाल्याने लवकरच गत तिन वर्षातील रखडलेले प्रस्ताव मार्गी लागतील असा आशावाद व्यक्त करुन या समितीच्या सदस्यपदी आपली नियुक्ती केल्याने पालकमंत्री ना.अतुल सावे,जिल्ह्यातील सर्व आजी-माजी खासदार-आमदार व महायुती-महाविकास आघाडीतील पदाधिकाऱ्यांसह जिल्हा प्रशासनाचेही ऋणी असल्याचे ते म्हणाले.

# जिद्द, मेहनत, चिकाटी हीच स्पर्धा परीक्षेतील यशाची गुरूकिल्ली- डॉ. पेशकार

## आदर्शमध्ये आठ दिवशीय आय.ए.एस. भरतीपूर्व कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मार्च**

येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान प्रायोजित आणि लोकप्रशासन विभाग यांच्यावतीने आयोजित दिनांक ४ मार्च ते ११ मार्च २०२६ या आठ दिवस चालणाऱ्या आय. ए. एस. भरती पूर्व प्रशिक्षण या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. उद्घाटक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, मंचावर उपप्राचार्य प्रो. डॉ. संजिवकुमार नरवाडे, प्रा. डॉ. सचिन पत्की, प्रा. अमजद खान पठाण, लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. दयाराम मस्के, सह समन्वयक प्रा. डॉ. सुभाष पोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रशांत पेशकार यांनी स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांनी त्यांची जिज्ञासा, जिद्द, चिकाटी, मेहनत, एकाग्रता आणि ध्येयाप्रतीची निष्ठा कायम ठेवल्यास अपेक्षित यश मिळणे शक्य असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थी हा वाचन संस्कृतीला जोपासणारा आणि संवर्धित करणारा झाला पाहिजे. स्पर्धा परीक्षेतील लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी सद्य:स्थितीतील चालू घडामोडीचे विश्लेषण आणि समीक्षण करण्याची डोळस दृष्टी ही विद्यार्थ्यांकडे असली पाहिजे. स्पर्धा परीक्षा पूर्ण करताना चालू घडामोडी या घटकाला सामोरे जावे लागते; यासाठी विविध वर्तमानपत्रे, मासिके आणि शासकीय संकेतस्थळांना भेटी देऊन अद्यावत सांख्यिकीय माहिती संकलित करावी आणि त्याची उत्तर लेखन करताना कल्पकता अंमलात आणावी हा दिशादर्शक कानमंत्र दिला. या स्पर्धेत टिकण्यासाठी प्रधानमंत्री उच्चत्तर शिक्षा अभियान योजने अंतर्गत विद्यार्थ्यांच्या आवडी - निवडी लक्षात घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: २०२० राबवले जात आहे. याची देखील विद्यार्थ्यांना पुरेशी माहिती व्हावी. शासकीय धोरणांची जाणीव जागृती आणि ज्ञानविज्ञानाचा प्रचार प्रसार होणे गरजेचे असल्याचे मत याप्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यशाळेचे समन्वयक डॉ. दयाराम मस्के यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांनी शासन आणि प्रशासनाने आता निर्णायक आणि कठोर भूमिका घेणे गरजेचे असल्याचे स्पष्ट मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सुभाष पोले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्रबंधक दिलिप दुबे, डॉ. आशिष गट्टाणी, डॉ. अण्णाजी मडावी, डॉ. तुकाराम हापगुंडे, डॉ. सुयोग दोडल, डॉ. आनंद भट, डॉ. बसवराज लक्षटे, डॉ. सोनलकुमार नगरकर, डॉ. सोपान खरात, डॉ. बाळासाहेब साळवे, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. राजाराम पिंपळपल्ले, डॉ. विलास पवार, डॉ. अविनाश पावडे, डॉ. लक्ष्मण सोळंके, डॉ. महेश्वर मंगनाळे, डॉ. प्रभाकर शिंदे, डॉ. आकाश बांगर, डॉ. सुरेश लेकुळे, डॉ. मारोती कोल्हे, प्रा. माधव बळवंते, दुर्गादास टापरे, बंडु ठाकुर, संजय राठोड, धम्मरत्नं इंगोले यांनी मोलाचे सहकार्य केले.

# महसूल प्रशासनाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाला सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मार्च**

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान करण्यासाठी शासनाच्या निर्णयानुसार 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा-१)' हिंगोली तालुक्यात महसूल मंडळनिहाय राबविण्यात येत आहे.

या समाधान शिबिरांमध्ये सर्वसामान्य नागरिकांसाठी संबंधित मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांची सेवा निश्चित दिनांकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

याअंतर्गत कनेरगांव नाका व सिरसम बु. मंडळ विभागात ७ मार्च, बासंबा मंडळात १४ मार्च, भांडेगाव येथे १० एप्रिल, डिग्रस कऱ्हाळे येथे १७ एप्रिल, खानापूर चित्ता येथे २४ एप्रिल, नर्सी नामदेव येथे २ मे, हिंगोली शहर मंडळात ८ मे आणि हिंगोली ग्रामीण मंडळात १५ मे २०२६ रोजी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरांमध्ये प्रलंबित फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती, लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रांचे वितरण, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पीएम किसान योजना, तक्रार निवारण आदी महसूल विभागाच्या विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

तसेच नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचे महसूल प्रशासनाशी संबंधित दैनंदिन प्रश्न स्थानिक स्तरावर निकाली काढणे, संजय गांधी निराधार योजनेसारख्या अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे, गरजू लाभार्थ्यांना ई-शिधापत्रिका तसेच डिजिटल सातबारा व आठ अ उतारे उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना जलद व सुलभ सेवा पुरविण्यावर भर देण्यात येणार असून, हिंगोली तालुक्यातील सर्व नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसिल कार्यालय, हिंगोली यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार- बावनकुळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मार्च**



हिंगोली जिल्ह्यातील शिरड शहापूर परिसरातील टेकड्यांचे अवैध उत्खनन आणि पूर्णा व कयाधू नद्यांमधील वाळू उपसा प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत दिले. या संपूर्ण प्रकरणाची तंत्रज्ञानाच्या माध्यमांतून महिनाभरात चौकशी करून अहवाल सादर केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आमदार जगन्नाथ अभ्यंकर यांनी या संदर्भात विधानपरिषदेत लक्षवेधी सूचना मांडली. माजी अतिरिक्त मुख्य सचिव सतीश त्रिपाठी यांनी दिलेल्या पुराव्यांचा दाखला देत, अभ्यंकर यांनी औंढा-वसमत रोडवरील शिरड शहापूर येथील टेकड्यांचे उत्खनन आणि नद्यांमधील अवैध वाळू उपशाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यामध्ये स्थानिक प्रशासकीय यंत्रणेची साखळी सामील असल्याचा आरोप त्यांनी केला होता.आमदारांच्या प्रश्नाला उत्तर देताना महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, संबंधित कंपन्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडून एकदाच परवानगी घेण्याऐवजी तहसीलदार आणि प्रांतांकडून ५००-५०० ब्रासच्या तुकड्या-तुकड्यांमध्ये परवानग्या घेतल्या आहेत, ही बाब शंकास्पद आहे. मंजूर केलेल्या मर्यादेपेक्षा कितीतरी पटीने जास्त उत्खनन झाल्याची शक्यता असून, या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. तहसीलदार आणि प्रांत अधिकारी स्वतः घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष मोजमाप करतील. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून संपूर्ण क्षेत्राचे मोजमाप केले जाईल. उत्खनन करण्यापूर्वीची स्थिती आणि सद्यस्थिती यांची तुलना केली जाईल. उपग्रहाद्वारे प्राप्त नकाशांच्या आधारे उत्खननाची व्याप्ती तपासली जाईल असेही ते म्हणाले. हिंगोली जिल्ह्यातील पूर्णा आणि कयाधू नद्यांमधील वाळू उपशाबाबतही पुनर्सर्वेक्षण केले जाईल. जर दिलेल्या परवानगीपेक्षा जास्त उत्खनन झाले असल्याचे सिद्ध झाले, तर कोतवालापासून ते प्रांतापर्यंत जे अधिकारी या साखळीत दोषी आढळतील, त्यांच्यावर विभागीय चौकशी लावून कडक कारवाई केली जाईल, असे बावनकुळे यांनी ठामपणे सांगितले. राज्यभरातील वाळू घाटांचे लिलाव पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.



**हिंगोली- येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर पोलिस भरतीचा शेवटचा दिवस होता. यावेळी महिला उमेदवारांनी सकाळपासूनच भरतीसाठी रांगा लावल्या होत्या. यावेळी पोलिस अधिकारी व कर्मचारी यांनी गोळाफेक तसेच इतर चाचणी घेतली. ६४ जागांसाठी सुमारे ८ हजार उमेदवारांनी पोलिस भरती प्रक्रीयेत सहभाग घेतला होता. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा



हिंगोली- येथील कै. ॲड ज्ञानबारावजी शिरसाट सेवाभावी संस्था अंतर्गत असणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती यामध्ये विद्यार्थ्यांना विज्ञान आधारित चित्र, आकृती काढण्यात सांगितले होते. सी व्ही रमण यांच्या जन्मदिवस हा विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो यावेळी सी व्ही रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांनी केलेल्या विज्ञानाच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली आणि त्यानंतर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली यामध्ये विद्यार्थ्यांनी सुंदर असे चित्र काढून विज्ञानाबद्दल आपली आवड दाखवली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर बल्लाळ, पर्यवेक्षक श्रीकांत कान्हेड, चाटसे, पाईकराव, कान्हेड, वाबळे,ठोके, मेटकर, टेकाळे, तसेच इम्रान व नरवाडे ताई आदींनी सहकार्य करून ही स्पर्धा यशस्वीपणे संपन्न केली.

### स्वाधार योजनेसाठी २० मार्चपूर्वी त्रुटी पूर्ण करा

हिंगोली- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' अंतर्गत अर्ज केलेल्या व (सेंड-बॅक) त्रुटीत आलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या अर्जातील त्रुटी दिनांक २० मार्चपूर्वी ऑनलाईन पद्धतीने पूर्ण कराव्यात, अशी अंतिम सूचना समाज कल्याण विभागामार्फत देण्यात आली आहे.शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र असूनही प्रवेश न मिळालेल्या किंवा विविध कारणांमुळे प्रवेश न घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास, भोजन व शैक्षणिक सुविधांसाठी आवश्यक आर्थिक सहाय्य थेट आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे.या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत स्वीकारण्यात आले होते. हिंगोली जिल्ह्यातून एकूण २८९६ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २५५ अर्ज विविध त्रुटींमुळे संबंधित विद्यार्थ्यांकडे परत पाठवण्यात आले आहेत. संबंधित विद्यार्थ्यांनी पोर्टलवर लॉगिन करून अर्जातील त्रुटी तात्काळ दुरुस्त कराव्यात. २० मार्चनंतर कोणतीही त्रुटी पूर्तता स्वीकारली जाणार नाही. तसेच अपूर्ण किंवा त्रुटीपूर्ण अर्ज कायमस्वरूपी नाकारले जातील व त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील. शासन निर्णयानुसार एकदा नाकारलेले अर्ज पुन्हा विचारात घेण्याची तरतूद नाही. म्हणून सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी वेळेत त्रुटी पूर्तता करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त गीता गुठ्ठे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# उन्हाचा पारा वाढला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मार्च**

मागील दोन दिवसांपासून हिंगोली शहरासह परिसरात उन्हाचा पारा वाढला असून दुपारनंतर तापमानात वाढ झाली असल्यामुळे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रूमाल, स्टोलचा वापर करतांना नागरिक दिसत आहेत. दुपारनंतर उन्हाची तीव्रता जाणवत असून सध्या तापमान ३३ ते ३७ अंशापर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे उन्हाच्या तीव्रतेपासून बचाव करण्यासाठी नागरिक लिंबु सरबत, ऊसाचा रस तसेच थंडपेये पिण्यासाठी दुकानात गर्दी करीत असतांना दिसत आहेत. तर दुपारनंतर रस्त्यावर शुकशुकाट दिसत आहे. उन्हाची तीव्रता अधिक जाणवत आहे.

# सिध्देश्वर उपसा जलसिंचन योजनेला मंजूरी आ. राजू नवघरे यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ५ मार्च**



अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सिद्धेश्वर उपसा जलसिंचन योजनेला अखेर शासनाची मान्यता मिळाली असून, या यशामागे आमदार राजु नवघरे यांचा सातत्यपूर्ण आणि ठाम पाठपुरावा निर्णायक ठरला आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे.

ही योजना कार्यान्वित व्हावी यासाठी आमदार नवघरे यांनी मंत्रालय स्तरावर अनेक बैठका घेतल्या. दिवंगत उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या विषयावर सविस्तर चर्चा झाली होती. तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडेही वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. हिंगोली जिल्हा हा राज्यपाल सिंचन अनुशेषात मोडत असल्याने या भागातील सिंचन प्रकल्पांना प्राधान्य देणे आवश्यक होते. हा अनुशेष दूर करून वसमत मतदारसंघातील सिंचन क्षेत्र वाढवण्याचा निर्धार आमदार नवघरे यांनी केला होता. अखेर त्या प्रयत्नांना यश आले असून, सिद्धेश्वर उपसा जलसिंचन योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषणालाही मंजुरी देण्यात आली आहे.

या योजनेमुळे वसमत मतदारसंघातील पांगरा शिंदे सर्कल, अंबा सर्कल, शिरडशहापूर सर्कल, पुरजल सर्कल आणि पूर्णा सर्कल मधील अनेक गावे सिंचनाखाली येणार आहेत. अंदाजे ३,००० ते ४,००० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून, वसमत तालुक्यातील २५ पेक्षा अधिक आणि औंढा तालुक्यातील १५ गावांतील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

या योजनेला मंजुरी मिळण्यात स्वर्गीय अजितदादा पवार यांचे मोठे योगदान होते. मात्र, आज ते आपल्या सोबत नसल्याची खंत सर्वांना आहे. यापूर्वीही त्यांनी पूर्णा नदीवरील पोटा, पिंपळगाव कुटे आणि परळी दथरथे येथील बंधाऱ्यांना संभाजीनगर येथील कॅबिनेट बैठकीत मंजुरी दिली होती. त्या कामांना सध्या गती मिळाली आहे.

सिद्धेश्वर उपसा जलसिंचन योजना पूर्णत्वास गेल्यानंतर मतदारसंघातील सिंचन क्षमतेत लक्षणीय वाढ होणार असून, शेती उत्पादनात वाढ, दुबार पिकांची संधी आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल होणार आहे.आमदार राजुभ नवघरे यांच्या अथक प्रयत्नांमुळे या महत्त्वाच्या योजनेला हिरवा कंदील मिळाला असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.वसमतच्या विकासासाठीचा हा एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे.

# डॉ. प्रकाश अंभोरे यांना राष्ट्रीय पातळीवरील आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मार्च**



येथील भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश सुशीला सखाराम अंभोरे यांना भारत सरकार नोंदणीकृत माणुसकी सोशल व ग्राहक संरक्षण फाऊंडेशन यांच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित 'आदर्श मुख्याध्यापक सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

हा भव्य सत्कार सोहळा १ मार्च २०२६ रोजी नाशिक येथील न्यू शेवंता बँक्केट हॉल येथे उत्साहात पार पडला. सहाय्यक आयुक्त मनीष सानप, न्यायाधीश शिल्पा डोलारकर, शिक्षणाधिकारी डॉ. नेहा शिरोळे, राष्ट्रीय ग्राहक संरक्षण समितीचे अध्यक्ष दादाभाऊ केदारे तसेच राष्ट्रीय सचिव डॉ. अविनाश झोटिंग यांच्या हस्ते डॉ. अंभोरे यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना अध्यक्ष दादाभाऊ केदारे म्हणाले की, डॉ. प्रकाश अंभोरे हे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात निस्वार्थ भावनेने कार्यरत असून त्यांच्या समर्पित सेवेमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे अनेकांना प्रेरणा व नवी दिशा मिळाली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊनच त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

राष्ट्रीय सचिव डॉ. अविनाश झोटिंग यांनीही आपल्या मनोगतात नमूद केले की, मुख्याध्यापक डॉ. अंभोरे यांचे शैक्षणिक नेतृत्व, संघटनात्मक कौशल्य आणि सामाजिक बांधिलकी आदर्शवत आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा सन्मान योग्यच आहे.

डॉ. अंभोरे यांना यापूर्वीही विविध मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये ग्लोबल एक्सलन्स आयकॉन अवॉर्ड, राष्ट्रीय शिक्षकरत्न नागरी पुरस्कार, संत गाडगे बाबा राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार, मराठवाडा रत्न पुरस्कार, मराठवाडा भूषण पुरस्कार तसेच स्व. अण्णाराव टाकळगव्हाणकर स्मृती पुरस्कार यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव ॲड. गयबाराव नाईक, संचालक केशवराव शिरसाट, पंडितराव बांगर व सर्व संचालक मंडळाने त्यांचे अभिनंदन केले. तसेच उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार, पर्यवेक्षक भारत शिंदे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव विठ्ठल सोळंके, प्राचार्य बाबासाहेब इंगोले, प्राचार्य विठ्ठल मुटकुळे, प्राचार्य प्रकाश नवघरे, मुख्याध्यापक नितीन अवचार, ओम तांबिले, प्रदीप बुद्रुक, माधवी आसेगावकर, नितीन बोंद्रे, बंडू सीतळे, माधव जाधव, नामदेव सरकटे आदींनी शुभेच्छा व्यक्त करून पुढील कार्यासाठी यश चिंतिले. डॉ. प्रकाश अंभोरे यांच्या या सन्मानामुळे हिंगोली जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राची कीर्ती अधिक उंचावली असून त्यांच्या कार्यातून समाजाभिमुख शिक्षणाची नवी दिशा अधोरेखित झाली आहे.

# युवा पुरस्कासाठी अर्ज करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मार्च**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्या वतीने सन २०२४-२५ या वर्षासाठी जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी पात्र युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांकडून नामांकने मागविण्यात येत आहेत.जिल्ह्यातील युवकांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने दरवर्षी हा पुरस्कार एक युवक, एक युवती व एक नोंदणीकृत संस्थेला प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारामध्ये युवक व युवतीस प्रत्येकी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रु. १० हजार रोख रक्कम, तर संस्थेस गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रु. ५० हजार रोख रक्कम देण्यात येणार आहे. इच्छुकांनी अर्जाचा विहित नमुना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली येथून कार्यालयीन वेळेत प्राप्त करून घ्यावा.